RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

अमरावती
३ शनिवार जानेवारी २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २१८
✻ पृष्ठ : ४ ✻ मूल्य रु : ३

# दैनिक विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या, भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका, समाजसेविका,

**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले**

यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन..!



## ६ बंडखोरांचा माघार घेण्यास नकार!

▸विदर्भ केसरी। नागपूर:

शिस्तप्रिय पक्ष अशी ओळख असलेल्या भारतीय जनता पक्षाला महानगरपालिका निवडणूकीत रिंगणात उतरलेल्या बंडखोर उमेदवारांनी धक्का दिला आहे. पक्षाच्या नेत्यांनी संवाद साधल्यावरदेखील सहा जणांनी मागे घेण्यास नकार दिला. तर ९६ जणांनी मात्र पक्षाच्या नेत्यांच्या विनंतीचा मान राखून माघार घेतली आहे. दुसरीकडे काँग्रेसच्या बहुतांश मोठ्या बंडखोरांना मनविण्यात काँग्रेस नेत्यांना यश आले आहे. भाजपमध्ये यंदा इच्छुकांची भाऊगर्दी झाली होती व पक्षातर्फे सर्वेक्षणं, मुलाखतींनंतर उमेदवारी देण्यात आली. भाजपने तब्बल १०५ नवीन चेहरे दिले व ५१ माजी नगरसेवकांचे तिकीट कापले. अनेक इच्छुकांचा भ्रमनिरास झाला व शंभराहून अधिक भाजपच्या कार्यकर्त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. त्यात माजी महापौर अर्चना डेहनकर यांचे पती विनायक डेहनकर, माजी नगरसेविका स्वाती आखतकर, श्रद्धा पाठक, सुनिल अग्रवाल, मुकुंद बापट, दीपक चौधरी, सुनिल मानेकर, वर्षा ठाकरे, हरीश दिकोंडवार यांचा समावेश होता. तर धीरज चव्हाण, सुबोध आचार्य यांना तर त्यांच्या प्रभागातून आणखी दोन उमेदवारांसह पक्षाकडूनच एबी फॉर्म मिळाला होता. मात्र त्यांचा एबी फॉर्म छाननीत रद्द झाला. भाजपने बंडखोरांना मनविण्यासाठी विशेष पथक गठीत केले होते व संबंधित नेते-पदाधिकाऱ्यांकडून बंडखोरांशी संपर्क करण्यात आला. त्यातील ९६ जणांनी

## महापालिकेसाठी ६६१ उमेदवार रिंगणात

▸विदर्भ केसरी। अमरावती,

महापालिकेच्या २२ प्रभागातील ८७ जागेसाठी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवारांपैकी गेल्या दोन दिवसात १६१ उमेदवारांनी माघार घेतली. आता ६६१ उमेदवार रिंगणात राहीले आहे. सर्वाधिक ८५ उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आहेत. त्या खालोखाल काँग्रेस, शिवसेना व भाजपाचे उमेदवारांची संख्या आहे. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेच्या दोन्ही गटासह वायएसपी, वंचित बहूजन आघाडी व एमआयएमचे उमेदवार रिंगणात असल्याने महापालिका निवडणुकीत बहूरंगी लढत होणार आहे. या सर्व पक्षांसह अपक्ष मिळून एकूण ८०९ उमेदवार कालपर्यंत रिंगणात होते. अर्ज मागे घेण्याच्या शुक्रवार अखेरच्या दिवशी सातही झोनमधून १६१ उमेदवारांनी रणांगण सोडल्याने या रिंगणात आता ६६१ उमेदवार राहीले आहेत. झोन १ मध्ये येणाऱ्या तीन प्रभागात ९७, झोन २ मध्ये येणाऱ्या तीन प्रभागात १००, झोन ३ मध्ये येणाऱ्या तीन प्रभागात ९४, झोन ४ मध्ये येणाऱ्या तीन प्रभागात १०८, झोन ५ मध्ये येणाऱ्या तीन प्रभागात ८३, झोन ६ मध्ये येणाऱ्या तीन प्रभागात ५३, झोन ७ मध्ये येणाऱ्या चार प्रभागात १२६ उमेदवार आहेत. निवडणुकीत भाजपाचे ६८, काँग्रेसचे ७४, राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे ८५, युवा स्वाभीमान पक्षाचे ४२, शिवसेना शिंदे गटाचे ७२, शिवसेना उबाठा ४२, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे १६, वंचित बहूजन आघाडी-युनायटेड फोरमचे ४८, एमआयएमचे १०, इतर पक्ष व अपक्ष २२५ उमेदवार आहेत.

# मुंबईचे लुटारू तुम्ही, रखवालदार आम्ही

### उबाठा प्रमुखांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची घणाघाती टीका : निवडणुका आल्या की उद्धवना येते मुंबई आणि मराठी माणसाची आठवण

▸विदर्भ केसरी। ठाणे :

**मुंबईचे लुटारू तुम्ही आहात आणि तिचे रखवालदार आम्ही आहोत, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे येथे पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता जोरदार टीका केली. निवडणुका आल्या की काहींना अचानक मुंबई आणि मराठी माणसाची आठवण येते. मात्र त्यांनी आजवर मुंबईसाठी आणि मराठी माणसासाठी नेमके काय केले, याचे उत्तर त्यांनी जनतेला द्यावे, असे आव्हान शिंदे यांनी दिले.**

मुंबईतील मराठी माणूस तुमच्याच कारभारामुळे मुंबईबाहेर फेकला गेला असून, त्याला पुन्हा मुंबईत आणण्याचे काम आम्ही करत आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले. भावनिक मुद्द्यांच्या आधारे मुंबईकर आणि मराठी माणसाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप करत शिंदे म्हणाले की, निवडणुकीपुरते मराठी प्रेम दाखवण्यापेक्षा विकासाची कामे समोर ठेवावीत. मुंबईतून मराठी माणूस बाहेर जाण्यास कोण जबाबदार आहे, याचे आत्मपरीक्षण करावे, असा टोलाही त्यांनी नाव न घेता विरोधकांना लगावला.



नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याबाबत विरोधकांकडून केली जाणारी टीका ही निंदनीय असल्याचे सांगत शिंदे म्हणाले की, भावनिक आवाहन करून मुंबईकर आणि मराठी माणसाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर अशा प्रकारची टीका करणे म्हणजे केवळ निवडणुकीपुरते राजकारण आहे.

ठाणे महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना शिंदे यांनी सांगितले की, शिवसेना–भाजप महायुतीचे सात नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून, ही विजयाची नांदी आहे. ठाणेकरांनी विजयाची सुरुवात केली आहे. त्या सर्व नगरसेवकांचे त्यांनी अभिनंदन केले. येत्या पंधरा तारखेला ठाणे महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकेल, याबाबत कुठलीही शंका नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कल्याण–डोंबिवली, जळगाव आदी ठिकाणीही महायुतीचे अनेक नगरसेवक बिनविरोध निवडून आल्याचे त्यांनी नमूद केले. बिनविरोध निवड ही कामाची पोचपावती असते. ज्या ठिकाणी विरोधकांना पराभवाची खात्री असते, तेथे ते माघार घेतात आणि बिनविरोध निवड होते, असे शिंदे म्हणाले.

- मुंबईच्या विकासावर बोलताना त्यांनी विरोधकांना सवाल केला की, तुम्ही एक तरी ठोस विकासकाम दाखवा. आम्ही खड्डेमुक्त रस्ते, काँक्रीट रस्ते, मेट्रो प्रकल्प सुरू केले, कोस्टल रोड पूर्ण केला. बंद पडलेले प्रकल्प आम्ही मार्गी लावले. मुंबईला ग्लोबल फिनटेक हब बनवण्याचा पंतप्रधानांचा दृष्टिकोन असून, त्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक महाराष्ट्राला मिळाली आहे, असे त्यांनी सांगितले.
- मराठी–गुजराती असा वाद निर्माण करून हिंदूंमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका करत शिंदे म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांनी कधीच असे राजकारण केले नाही. विकासाचे राजकारण करा, भावनिक मुद्द्यांवरून लोकांची दिशाभूल करू नका, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. महापालिका निवडणुकांमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळेल, ठाणे हा महायुतीचा बालेकिल्ला राहील आणि सोळा तारखेला राज्यभर महायुतीचा भगवा फडकेल, असा ठाम विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

## तसा मिंधे लक्षात राहील

### ठाकरेंचा एकनाथ शिंदेंवर खोचक टोला,

▸विदर्भ केसरी।

जशी लढाई मुघलांबरोबर झाली तशीच लढाई मुंबई महानगरपालिकेची आहे. सूर्याजी पिसाळ जसा 400 वर्ष लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील, असा खोचक टोला शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर लगावला आहे. उमेदवारांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरेंनी शिंदेंसह पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधला.

उद्धव ठाकरे म्हणाले, जशी लढाई मुघलांबरोबर झाली तशीच लढाई मुंबई महानगरपालिकेची आहे. सूर्याजी पिसाळ सारखा गद्दारीचा टिळा 400 वर्षे झाली तरी मिटला नाही तर या गद्दारांचे काय? सूर्याजी पिसाळ जसा 400 वर्षे लक्षात राहिला तसा मिंधे लक्षात राहील, असा हल्लाबोल ठाकरेंनी केला.

दोन गुजरात्यांच्या हातात आपल्याला मुंबई द्यायची नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावर निशाणा साधला. तसेच आपण मनाने काम करावे, समोरून धनाचा वर्षाव मोठ्या प्रमाणावर होणार आहे. एकही जागा नतद्रष्टांच्या हाती द्यायची नाही. तसेच जे आता इथे आले आहेत ते सर्व निवडून आले पाहिजेत, असेही ठाकरेंनी म्हटले.

## नऊ महिन्यांच्या गर्भवतीची सहा किमी पायपीट

### गडचिरोलीतील हृदयद्रावक घटना! आधी बाळ गेले, नंतर आईचाही अंत

▸विदर्भ केसरी। गडचिरोली :

गावात प्रसूतीची सोय नसल्याने नऊ महिन्यांच्या गर्भवतीने जंगलमार्गाने पतीसोबत बहिणीच्या गावी जाण्यासाठी तब्बल सहा किलोमीटर पायपीट केली. पहाटे तिला प्रसवेदना जाणवू लागल्यानंतर रुग्णवाहिकेतून हेडरी (ता. एटापल्ली) येथील लॉयडस् मेटल्सच्या कालीअम्माल हॉस्पिटलमध्ये भरती केले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, पण आधी बाळ आणि काही वेळातच मातेने प्राण सोडले. ही हृदयद्रावक घटना २ जानेवारीला पहाटे घडली. दरम्यान, एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्याऐवजी अहेरीला पाठविल्याने मृत्यूनंतर माय- लेकरांची फरफट झाली, त्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

आशा संतोष किरंगा (२४,रा. आलदंडी टोला ता. एटापल्ली) असे त्या मृत मातेचे नाव आहे. ती नऊ महिन्यांची गर्भवती होती. आलदंडी हे तालुका मुख्यालयापासून सहा किलोमीटर अंतरावर आहे. दरम्यान, प्रसववेदना जाणवताच तातडीने दवाखाना जवळ करता यावा यासाठी १ जानेवारीला आशा किरंगा ही पती संतोष सोबत आलदंडी टोला येथून जंगलातील मार्गाने सहा किलोमीटर पायपीट करत तोडसाजवळील पेठा गावात आपल्या बहिणीच्या घरी राहण्यासाठी गेली. मात्र, दिवसभर अवजडलेल्या स्थितीत चालल्याने २ जानेवारीला रोजी पहाटे २ वाजता तिला प्रसववेदना जाणवण्यास सुरुवात झाली. पेठा गावातील आशासेविकेने हेडरी येथील लॉयडस् कालीअम्माल हॉस्पिटलशी संपर्क करुन रुग्णवाहिका पाचारण केली. रुग्णवाहिकेतून तातडीने दवाखान्यात भरती केले. डॉक्टरांची सिझेरियनचा निर्णय घेतला. मात्र, बाळ पोटातच दगावल्याचे आढळले. त्यानंतर आशा किरंगा यांचा रक्तदाब वाढला, त्यानंतर त्या सावरल्याच नाहीत. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, पण नियतीने डाव साधलाच. प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राकेश नागोसे यांनी दवाखान्यात धाव घेत सविस्तर माहिती जाणून घेतली.



AI generated image

- "संबंधित गर्भवतीच्या आशासेविकांमार्फत गृहभेटी घेतल्याची नोंद आहे. ती पायी चालल्यामुळे तिला अचानक प्रसववेदना झाल्या, डॉक्टरांनी सर्वतोपरी प्रयत्न केले, पण यश आले नाही. या घटनेचा तालुका आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत अहवाल मागवला आहे."
- - डॉ. प्रताप शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी

## लोकशाहीच्या नावानं झुंडशाही सुरू

### बिनविरोध निवडीवरून राऊत संतापले, दिला महत्त्वाचा इशारा!

▸विदर्भ केसरी।

- "एका बाजूला आपल्या लोकांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी समोरच्या उमेदवाराना ५-५ कोटी द्यायचे व माघार घ्यायला लावायची आणि दुसऱ्या बाजूला हे असे उद्योग करायचे. लोकशाहीच्या नावाने ही झुंडशाही चालू आहे. एकदिवस इकडे नेपाळ आणि बांगलादेश प्रमाणे जन उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही!", असाही इशारा संजय राऊतांनी दिला आहे.

राज्यातील महापालिका निवडणुकीत महायुतीने बिनविरोध विजयाचा गुलाल उधळला असला तरी, या विजयावरून आता राजकीय युद्ध पेटले आहे. शिवसेना खासदार संजय राऊत यांनी एक खळबळजनक ट्वीट करत महायुतीवर झुंडशाहीचे गंभीर आरोप केले आहेत.

उमेदवारांना पाच-पाच कोटींची लाच देणे आणि निवडणूक अधिकाऱ्यांवर दबाव टाकणे, असे उद्योग करून ही निवडणूक प्रक्रिया राबवली जात असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कामाच्या जोरावर आणि विश्वासापोटी उमेदवार बिनविरोध झाले, असा दावा केला होता. मात्र, संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंच्या दाव्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. केवळ पैशांचा वापर आणि सरकारी यंत्रणेचा धाक दाखवून हे विजय मिळवले जात असल्याची टीका त्यांनी केली आहे.

संजय राऊत म्हणाले की, "रात्री कितीही वाजेपर्यंत माघारीचा अर्ज आणून दिल्यास तो तीन वाजेच्या आत आणून दिलेला आहे, असे समजून माघार नोंदवावी अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेत असलेला माझा एक मित्र आत्ताच मला फोनवर बोलला की, त्याने असे करणे चुकीचे होईल असे म्हणाल्यावर त्याला लगेच पालकमंत्र्यांचा फोन आला आणि आमचे स्थानिक आमदार काय सांगतात त्याप्रमाणे करा अशी धमकी बजा विनंती त्याला करण्यात आली."

## सोलापूरमध्ये तिकीट वाटपावरून राडा

### मनसे नेत्याची हत्या झाल्याचा जिल्हाप्रमुखांचा दावा; माजी नगरसेवकाचे कार्यालय फोडले

▸विदर्भ केसरी।

सोलापूरमध्ये भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपच्याच कार्यकर्त्याने पक्षाचे कार्यालय फोडले असल्याची घटना समोर आली आहे. शहरातील जोशी गल्लीतील माजी नगरसेवक शंकर शिंदे यांच्या कार्यालयाची तोडफोड करण्यात आली असून परिसरात तणाव निर्माण झाला असल्याची माहिती समोर आली आहे. याच वेळी मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या मनसे नेत्याची हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेसंदर्भात प्राथमिक माहिती अशी की, हा वाद भाजपच्याच दोन गटात झाला आहे. यातील एका गटातील कार्यकर्त्याला तिकीट मिळाल्यानंतर दुसऱ्या गटाने कार्यकर्त्याच्या कार्यालयाची तोडफोड केली आहे. कार्यालय फोडल्यानंतर सर्वत्र काचा पसरल्या होत्या.

तसेच परिसरात तणावाचे वातावरण पसरले होते. समाजात तणाव नको म्हणून मनसे नेते बाळासाहेब सरवदे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला.

या प्रकरणी मनसे जिल्हाप्रमुख दिलेल्या माहितीनुसार, मनसे विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांच्या काकू भाजपकडून उमेदवारीसाठी इच्छुक होत्या. परंतु, त्यांना तिकीट न मिळाल्याने याचा जाब विचारण्यासाठी बाळासाहेब सरवदे हे शंकर शिंदे यांच्या संपर्क कार्यालयात गेले असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. तसेच यात त्यांचा मृत्यू झाल्याचाही दावा मनसे जिल्हाप्रमुख प्रशांत इंगळे यांनी केला आहे.

**बाळासाहेब सरवदेंवर जीवघेणा हल्ला**

- प्रभाग दोनमध्ये भाजपच्या अधिकृत उमेदवार शालन शिंदे आणि बंडखोर उमेदवार रेखा सरवदे यांच्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या वादाला आता हिंसक वळण लागले. अर्ज माघारी घेण्यावरून दोन्ही गटांत झालेल्या वादात भाजप नेते शंकर शिंदे यांचे कार्यालय फोडण्यात आले, तर याचवेळी मध्यस्थीसाठी आलेल्या बाळासाहेब सरवदे यांच्यावर शिंदे गटाच्या समर्थकांनी जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या सरवदे यांना तातडीने सोलापूरच्या सहकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

## प्रतिष्ठित मंगलधाम प्रभागाला 'बेवडा' ठरवण्याचा प्रकार

### नगराध्यक्षांच्या वक्तव्याची शहरात चर्चा ; अभिष्टचिंतन सोहळ्यात केले वक्तव्य

▸**विदर्भ केसरी।वाशिम विशेष प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीत प्रत्येकांनी आपलं नशीब आजमावल, यात नव नवखे नगरसेवक झाले तर मात्तबरांना धुड चाटावी लागली प्रभाग क्रमांक ९ मध्ये ३५ वर्षांपासून दारूचा महापुरा मुळे सदस्य पद अबाधित व आता पराभवा नंतर "म्हणे" गाडीच्या डिक्कीत नाइंटी चे क्वार्टर, देऊन मतदान मिळवले. ज्या शहराने मागील चाळीस वर्षांपासून प्रेम देऊन मतदान देत शहराच्या शिरपेचावर बसवले त्याच शहरातील जनता व मतदार यांना एका पराभवामुळे जर बेवडे ठरवल्या जात असनार या पलीकडे दुर्दैवी बाब कुठलीच नाही, प्रभाग क्रमांक ९ मंगलधाम हे फार जुनी प्रतिष्ठित व उच्च विभुषीत कॉलनी येथे सर्व नौकरी करणारे अधिकारी कर्मचारी आणि इजारदार, त्यामुळे अनेकांनी प्रश्न उपस्थित केला की संपूर्ण मतदारांना म्हणजे त्यात महिला ! जर मागील ३५ वर्षांपासून जर यांना नगरसेवक म्हणून निवडून दिले तर ते बेवडे नाही आणि यावेळी बोगस मतदार मतदान यादितुन हल्ल्यामुळे पराभव झाला तर संपूर्ण प्रभागच बेवडा, अशा वक्तव्यावर येथील संपूर्ण महिला भडकल्या असुन शहरात सध्या त्या वक्तव्यावर वातावरण तापलेले आहे, नगराध्यक्ष हा शहराचा पालक ( वडील ) आणि त्यांच्या मुखातून संपूर्ण एका प्रभागा विषयी ऐवढा आकस हे येथील जनतेच्या डोक्यात भीनले, राजकारण हे राजकारणा चे ठिकाणी योग्य व त्यात जे षडयंत्र आहे ते ही करायला हवे आणि याच प्रभागात दोन्ही दारू व्यसायीक यांनी उमेदवारी मिळवली दोन्ही उमेदवार सत्ताधारी, मात्र महिला व प्रतिष्ठितांच्या अब्रुचे धिंडवडे कशाला? त्यामुळे येत्या काळात मंगलधाम व प्रभाग क्रमांक ९ मधील जनता व मतदार हे कोणते आंदोलन उभं करनार आणि स्थानिक आमदार या भाष्यावर कीती गंभीरता दाखवनार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे पण आज रोजी चर्चा फक्त त्या नागरी सत्कारातील वक्तव्याची की .... "गाडीच्या डिक्कीत नाइंटी चे क्वार्टर प्रत्येक मतदाराला दिले व मतदान केल्यावर तुला दोन देऊ" अश्या वक्तव्याचे व्हिडिओ क्लिप शहरातील जनतेतून हास्यास्पद व्हायरल केल्या जात आहे तर उच्च विभुषीतांचे व राजकीय समिक्षकांचे मते हा शिक्षनाचा अभाव असु शकतो, आणि भावविभुर होऊन डोक्यात असलेले मनाद्वारे मुखातुन येऊ शकते, पण हे चुकीचे असे अनेक जाणकारांनी आपले मत व्यक्त केले

**...मग आमच्या लाडक्या बहिणी पण बेवड्या का ?**

- या वक्तव्याचा मी निषेध करतो, असा घाणाघात आमदार शाम खोडे यांचा शहरातील उच्च पदावर विराजमान झालेल्या पदाधिकाऱ्यांनी मग तो कोणत्याही पक्षाचा असो त्यात वावगे नाही, मी नेत्रुत्व करतो मतदार संघाचे आणि हा असा प्रकार निंदनीय आहे, आम्ही आमच्या लाडक्या बहिणीला महिण्याकाठी १५०० रू फक्त तीच्या संसारात हातभार लागावा करीता नियोजन, आम्ही आमच्या राजकारणात दारू व मादक पदार्थ हा विषय कधीच राहला नाही, आपण सर्व जनतेने भरभरून प्रेम देऊन मला प्रतिनिधित्व बहाल केले, तसेच मंगरूळपीर शहरातील जनतेने सुद्धा अवशकते नुसार आपलं प्रतिनिधित्व निवडलं मात्र पालकत्व स्वीकारलेल्या या प्रतिनिधी कडुन महिला भगिनींना वाईट संबोधने कुठं पर्यंत योग्य,.... त्यांनी म्हटले की प्रभाग ९ मध्ये गाडिच्या डिक्कीत नाइंटी चे क्वार्टर प्रत्येक मतदाराला दिले व मतदान केले की दोन देऊ... मग यात आमच्या लाडक्या बहिणीला बेवडेच म्हटले ना..! -श्याम खोडे आमदार

## नराधमास २० वर्षे सश्रम कारावास

▸विदर्भ केसरी। पांढरकवडा

अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमास पांढरकवडा (केळापूर) येथील विशेष न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. 'पोक्सो' कायद्यांतर्गत दाखल असलेल्या या गंभीर प्रकरणात न्यायालयाने शुक्रवारी (दि. २) हा ऐतिहासिक निकाल दिला.

प्रशांत ठाकरे रा. नायगाव असे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. २०२३ मध्ये वणी तालुक्यातील एका गावात आरोपी हा पीडितेच्या घरासमोर राहत होता. पीडितेचे आई-वडील कामावर गेल्याची संधी साधून त्याने घरात प्रवेश केला आणि पीडितेसह तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी देऊन पीडितेवर अत्याचार केला. आरोपीच्या धमकीला घाबरून पीडितेने कोणास काहीही सांगितले नाही. मात्र, काही महिन्यांनंतर पीडितेची तब्येत बिघडल्याने तिला वणी आणि त्यानंतर नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी नेण्यात आले. तपासणीअंती पीडिता २० आठवड्यांची गर्भवती असल्याचे समोर आले.

नागपूर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवरून अजनी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून तो वणी पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. साहाय्यक पोलीस फौजदार श्रीमती मायाताई चांदे यांनी या प्रकरणाचा अत्यंत बारकाईने तपास केला. तपासादरम्यान आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने प्रकरण पांढरकवडा येथील विशेष न्यायालयात न्यायप्रविष्ठ करण्यात आले. अतिरिक्त शासकीय अभियोक्ता श्री. प्रशांत अ. मानकर यांनी अभियोग पक्षाच्या वतीने ७ महत्त्वाचे साक्षीदार तपासले. विशेष सत्र न्यायाधीश श्री. अभिजित एम. देशमुख यांनी पीडितेची साक्ष, वैद्यकीय अहवाल आणि पुराव्यांच्या आधारे आरोपीला दोषी धरले.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
शनिवार, ३ जानेवारी २०२६ | २

## अग्रलेख

# विवाह पद्धतीतील वळणे

*विवाहाचा प्रकार कोणताही असो, यशस्वी वैवाहिक जीवन केवळ परस्पर आदर, विश्वास, संवाद आणि एकमेकांना समजून घेण्यावर अवलंबून असते. काळानुसार विवाह पद्धतीत बदल झाले असले तरी, दोन व्यक्तींनी एकत्र येऊन कुटुंब व्यवस्था पुढे चालवण्याचा मूळ उद्देश आजही कायम आहे.*

*प्रेम विवाह (पळून जाऊन/नोंदणी पद्धत)चे फायदे लक्षात घेतल्यास यात पूर्ण स्वातंत्र्य मिळते, स्वतःच्या पसंतीचा जोडीदार निवडता येतो आणि वैयक्तिक आनंदाला प्राधान्य मिळते. अनेक वर्षांपासून प्रेमसंबंध असल्यास एकमेकांना पूर्ण ओळखलेले असते, एकमेकांना खूप वेळ समजून घ्यायला मिळालेला असतो. स्वभाव, गुण, दोष पूर्ण माहिती असते त्यामुळे वैवाहिक आयुष्य यशस्वी व्हायला मदत होते. तरीही आजमितीला आपण बघतोय की प्रेम विवाह पण तुटण्याचे प्रमाण मोठे आहे. प्रेम विवाहबद्दल तोटे सांगायचे झाल्यास कुटुंबाचा/समाजाचा तीव्र विरोध असतो, भावनिक आधार गमावणे तसेच काही कायदेशीर अडचणी येणे तसेच सामाजिक एकाकीपणा येऊ शकतो. अशा विवाहात कोणतीही समस्या आल्यास त्यावर उत्तर शोधायला जबाबदार व्यक्ती उपलब्ध नसते, हे विवाह अयशस्वी झाल्यास दुःख, नैराश्य, पच्छाताप पदरात पडतो, माघारी परतण्याचे रस्ते पण बंद झालेले असतात. लव्ह-कम-अरेंज मॅरेजचे फायदे पहिल्यास लक्षात येते की, प्रेम आणि कौटुंबिक आशीर्वादाचा समन्वय साधला जातो, कुटुंबाचा पाठिंबा मिळतो आणि सामाजिक स्वीकृती मिळते. मुलाला अथवा मुलीला कलंक लागत नाही, जोखीम कमी होते तसेच आयुष्यभरासाठी कुटुंबाची, इतर नात्यांची ताटातूट होत नाही. या लग्नाचे तोटे बघितल्यास यात कुटुंबाला मनवण्यासाठी वेळ आणि प्रयत्न खूप करावे लागतात तसेच दोन्ही कुटुंबांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा ताण येतो. दोन्ही मधील एका जरी कुटुंबाने परवानगी नाकारली तरी, अथवा खूप विरोध केला तर प्रेमाचा त्याग करायची तयारी ठेवावी लागते. नोंदणी करून लपवणे ही विवाह पद्धत त्वरित कायदेशीर मान्यता लग्नाला मिळवून देते. कोणाला सांगणं, विचारणं, चर्चा, विरोध, टीका अथवा संघर्षाचा ताण कमी होतो. यातील तोटे पण मोठ्या प्रमाणात जाणवतात. लग्न लपवण्याचा ताण सतत असतो. लग्नासारखी गोष्ट जास्त काळ लपून राहत नाही. छोटा कार्यक्रम करू तेव्हा सांगू असा निर्णय घेतला तरी त्या वेळी नातेवाईक किती दुखावलेले असतील, ते कार्यक्रमात सहभागी होतील का? नातेवाईक कायमचे तुटतील का? याचा तणाव सातत्याने मनावर राहतो. लग्न होऊन ते जाहीर होईपर्यंत अनेकांना ते कुठून न कुठून कळते त्यामुळे नात्यात अविश्वास वाढतो. या सर्व लग्न पद्धतीचे पती-पत्नी आणि कुटुंबावर होणारे परिणाम जाणून घेणे आवश्यक आहे. पारंपरिक ठरवून केलेले लग्न असल्यास पती-पत्नीवर सुरुवातीला जुळवून घेण्याचा ताण असतो, पण कालांतराने नात्यात स्थिरता आणि सुरक्षितता येते. अशा लग्नाचा कुटुंबावर सकारात्मक परिणाम होतो. कुटुंबाचे मोठे जाळे तयार होते, मुलांचे भविष्य सुरक्षित होते आणि दोन्ही कुटुंबांचे संबंध दृढ होतात. दोन्हींकडील मंडळींची एकमेकांना सातत्याने मदत, आधार, सहकार्य होऊ शकते. जन्माला आलेल्या नवीन आपत्याला दोन्हींकडील प्रेम, सहवास लाभतो. प्रेमविवाह (पळून जाऊन/नोंदणी पद्धत) याचा पती-पत्नीवर परिणाम वेगवेगळ्या पद्धतीने होतो. एकमेकांवर अधिक अवलंबून राहणे, तिसरं कोणीही काहीच सांगायला, समजवायला नसणे त्यामुळे या जोड्या असुरक्षित वातावरण असल्याने त्यांच्यात मानसिक ताण आणि भावनिक चढ-उतार सतत होत राहतात. जोडीदाराशी बिनसलं तर खूप एकाकी पनाची भावना निर्माण होते. या लग्नाचे कुटुंबावर होणारे परिणाम लक्षात घेणे आवश्यक आहे. कुटुंबातील संबंध तुटतात किंवा ताणले जातात, कुटुंबाची सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येते, अनेकदा एकमेकांच्या जीवावर उठणे, टोकाची भांडणे, वाद, धमक्या देणे, पोलीस कंप्लेंट, मारामाऱ्या यांसारख्या घटना घडू शकतात. अनेकदा अश्या लग्नात दीर्घकाळानंतर तणाव कमी होऊ शकतो. नोंदणी करून लपवणे या प्रकारात पती-पत्नीवर सततचे दडपण आणि गुपित उघड होण्याची भीती असते, ज्यामुळे प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उभे राहू शकते. अनेक जवळची लोकं कायमस्वरूपी दुखावली जातात, नात्यात दुरावे तयार होतात आणि उलट-सुलट चर्चा, अफवा, गैरसमज याला खतपाणी घातले जाते. प्रत्येक जण अशा लग्नाचा स्वतःच्या सोयीने, स्वतःच्या दृष्टिकोनातून वेगवेगळा अर्थ काढतो. अशा लग्नाचा कुटुंबावर परिणाम पाहिला असता कुटुंबात अविश्वास आणि गैरसमज वाढतो. ही गोष्ट उशिरा जाहीर केल्यास समाजातून, नात्यातून तीव्र नकारात्मक प्रतिक्रिया येण्याची शक्यता असते. वधू-वरांचा प्रामाणिकपणा, पारदर्शी पणा यावर प्रश्न चिन्ह निर्माण होते. आताच हे असे वागले तर पुढे यांच्याकडून काय अपेक्षा करायची असा विचार केला जावू शकतो. आधुनिक विवाह व्यवस्था अनेक प्रकारची लवचिकता घेऊन आली आहे. तरुण पिढी आता "माझे वैयक्तिक स्वातंत्र्य विरुद्ध कुटुंबाची इच्छा" या द्विधा मनस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत आहे. जुन्या पिढीसाठी कौटुंबिक आणि सामाजिक सुरक्षा महत्त्वाची होती, तर नवीन पिढीसाठी वैयक्तिक आनंद आणि भावनिक जुळणारे संबंध अधिक महत्त्वाचे ठरत आहेत. विवाहाचा प्रकार कोणताही असो, यशस्वी वैवाहिक जीवन केवळ परस्पर आदर, विश्वास, संवाद आणि एकमेकांना समजून घेण्यावर अवलंबून असते. काळानुसार विवाह पद्धतीत बदल झाले असले तरी, दोन व्यक्तींनी एकत्र येऊन कुटुंब व्यवस्था पुढे चालवण्याचा मूळ उद्देश आजही कायम आहे. आपण आंतरजातीय विवाह किंवा विवाह समुपदेशन यांसारख्या विषयांवर लग्नाआधी व्यवस्थित मार्गदर्शन घेणे, खासगी डिटेक्टिव्ह एजेन्सीमार्फत भावी वधू-वराची सखोल माहिती जाणून घेणे यावर भर दिल्यास आपले वैवाहिक आयुष्य निश्चित सुखी, समाधानी होण्यास मदत होईल.*

# पैनगंगा अभयारण्य विकासाच्या प्रतीक्षेत

### स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानंतरही सोयीसुविधांचा दुष्काळ

### आमदार-खासदारांचे दुर्लक्ष; खरुज-ढाणकी पुलाच्या उंचीमुळे शिक्षणाचाही प्रश्न ऐरणीवर

**▸विदर्भ केसरी।ढाणकी (प्रतिनिधी): मिलिंद चिकाटे**




उमरखेड तालुक्यातील निसर्गसंपदेने नटलेले पैनगंगा अभयारण्य आजही शासनाच्या आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे विकासापासून वंचित आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होऊन ७५ वर्षे उलटली, तरी या परिसरातील पायाभूत सुविधांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. रस्ते, रोजगार आणि सुरक्षितता या आघाड्यांवर येथील नागरिकांना आजही संघर्ष करावा लागत आहे.

**रस्त्यांची दुरवस्था आणि भ्रष्ट कारभार**

अभयारण्यातील अंतर्गत रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडले आहेत. विशेष म्हणजे, काही ठिकाणी नवीन रस्ते करण्यात आले, मात्र ते इतक्या थातूरमातूर पद्धतीने केले गेले की पहिल्याच पावसात पुन्हा खड्डे पडले आहेत. यामुळे पर्यटकांना आणि स्थानिक आदिवासींना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

सन १९९० च्या दशकात या भागात नक्षलवादी विजयकुमार याला ठार करण्यात आले होते आणि अनेक नक्षलवाद्यांना अटकही झाली होती. तरीही, या भागाला नक्षलग्रस्त घोषित करून शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणारे अतिरिक्त मानधन दिले जात नाही. परिणामी, कर्मचारी या भागात काम करण्यास टाळाटाळ करतात, ज्याचा थेट फटका स्थानिक आदिवासी समाजाच्या विकासाला बसत आहे.

पैनगंगा नदीवरील सहस्त्रकुंड धबधबा हे पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. मात्र, या परिसरात कोणतीही सुविधा नसल्याने पर्यटक नाईलाजास्तव मराठवाड्यातील इस्लापूर मार्गे येतात आणि परततात. जर या परिसरात सोयी-सुविधा निर्माण केल्या असत्या, तर ढाणकी परिसरातील स्थानिकांना पर्यटनावर आधारित रोजगार मिळाला असता. मोठ्या उद्योगांचा अभाव असल्याने येथील तरुण रोजगारासाठी भटकत आहेत.

खरुज खुर्द ते ढाणकी या मार्गावरील पुलाचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात या पुलावर पाणी येते. २०२५ च्या पुरात पाणी वाढल्यामुळे दोन ते तीन दिवस शालेय मुलींना शाळेतच मुक्कामी राहावे लागले होते. या पुलाची उंची वाढवल्यास हा राज्यमार्ग बाराही महिने सुरळीत चालू शकेल, असे जाणकार सांगतात.

**■ या अभयारण्यात वाघ, बिबट्या, अस्वल आणि मौल्यवान औषधी वनस्पतींचे भांडार आहे. मात्र, लोकप्रतिनिधी केवळ मतदानापुरतेच या भागात दिसतात. मोरचंडी आणि परिसरातील नागरिकांनी विकासाच्या मुद्द्यावरून मतदानावर बहिष्कार टाकण्याचा पवित्रा घेतला होता, त्यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आश्वासने देऊन तो मागे घ्यायला लावला. मात्र, आजही परिस्थिती 'जैसे थे' असल्याने राजकीय नेत्यांविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

**■ "निसर्गाची देणगी असूनही केवळ राजकीय इच्छाशक्तीअभावी पैनगंगा अभयारण्य आणि येथील आदिवासी बांधव विकासापासून दूर आहेत. शासनाने तातडीने याकडे लक्ष न दिल्यास जनआंदोलन छेडले जाईल." — स्थानिक नागरिक**

# सुफलदास महाराज आश्रमात नववर्षाचे जंगी स्वागत.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



तालुक्यातील पिवशी-पांढरी येथील श्री श्री १००८ तपस्वी महंत सुफलदास महाराज संस्थान गुरुभोलेनाथ आश्रम, येथे नवीन वर्षाचे स्वागत अध्यात्मिक उत्साहात करण्यात आले. श्री श्री १००८ महंत खडेश्री महाराज यांच्या भक्त परिवाराच्या वतीने १ जानेवारी २०२६ रोजी भव्य स्नेहभोजन व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भक्ती आणि निसर्गाचा अपूर्व संगम अकोला-अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील नवसाळ फाट्यापासून अवघ्या ६ किमी अंतरावर असलेल्या या आश्रमात नवीन वर्ष सर्वांना सुख-समृद्धीचे जावे, या हेतूने दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. महंत केशवदासजी त्यागी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या सोहळ्यात बाळासाहेब गणोरकर यांनी सर्वप्रथम सुफलदास महाराजांच्या समाधी मूर्तीची षोडशोपचार पूजा व आरती केली. यावेळी पंचक्रोशीतील नागरिक व गणमान्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पर्यटनाच्या दृष्टीने विकासाची प्रतीक्षा हा आश्रम विलोभनीय नैसर्गिक वनसंपदेने नटलेला असून, येथील शांत व मनमोहक वातावरण भाविकांना भुरळ घालते. विविध प्रकारचे पशू-पक्षी आणि निसर्गाचे सानिध्य यामुळे हे स्थान केवळ धार्मिक केंद्र न राहता एक उत्तम निसर्ग पर्यटन स्थळ म्हणून विकसित होऊ शकते. सध्या भाविकांना जंगलातून आणि नदी-नाल्यांतून वाट काढत यावे लागते. याकडे शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देऊन या परिसराचा पर्यटन विकास करावा, अशी मागणी यानिमित्ताने जोर धरू लागली आहे. विविध उत्सवांची परंपरा आश्रमात वर्षभर श्रावण मास, महाशिवरात्री, रामनवमी, हनुमान जयंती आणि सुफलदास महाराजांचा पुण्यतिथी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सर्वच सण-उत्सवांना भाविकांची मोठी गर्दी असते. नवीन वर्षाच्या या स्नेहभोजन कार्यक्रमामुळे भक्तांमध्ये पुन्हा एकदा उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# शिक्षक भरतीत धोरणांचा गोंधळ

**▸विदर्भ केसरी।पुणे :**

राज्यातील शिक्षक भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि सुसूत्र व्हावी, या उद्देशाने शासनाने पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीची जबाबदारी राज्य परीक्षा परिषदेकडे देण्याचा नुकताच निर्णय घेतला.

मात्र, या निर्णयावरून सरकारच्याच धोरणांमध्ये मोठा विरोधाभास निर्माण झाल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसून येत आहे. एकीकडे शासन म्हणते की, शिक्षण आयुक्तांवर कामांचा प्रचंड ताण आहे, त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यात अडचणी येत आहेत. म्हणूनच, शिक्षक भरतीसारखी महत्त्वाची जबाबदारी परीक्षा परिषदेकडे सोपवण्यात आली. पण दुसरीकडे, याच प्रक्रियेसाठी स्थापन करण्यात आलेल्या 'सुकाणू समिती'चे अध्यक्षपद शिक्षण आयुक्तांकडेच देण्यात आले आहे. त्यामुळे खरा प्रश्न उपस्थित होतो की, जर शेवटी निर्णय आयुक्तच घेणार असतील, तर परीक्षा परिषदेकडे जबाबदारी देण्याचा अर्थ काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या निर्णयाला अनेक शिक्षक संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यांच्या मते, राज्य परीक्षा परिषद ही संस्था पूर्णपणे पारदर्शकपणे शिक्षक भरती प्रक्रिया राबवेल, याबाबत शंका आहे. टेट आणि टीईटीसारख्या परीक्षांमध्ये गंभीर घोटाळ्याचे आरोप परीक्षा परिषदेवर संघटनेने केले आहे. शिक्षक भरतीसारखी मोठी, संवेदनशील आणि थेट रोजगाराशी संबंधित प्रक्रिया त्याच संस्थेकडे देणे योग्य नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, या सर्व प्रक्रियेत अंतिम निर्णय, अधिकार शिक्षण आयुक्तांकडेच राहणार असल्याने 'जबाबदारी वेगळी आणि अधिकार वेगळे' अशी गोंधळाची स्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सरकारचा दावा आहे की, परीक्षा परिषदेकडे जबाबदारी दिल्यास वेळेची बचत होईल, प्रक्रिया सुलभ होईल आणि भरती लवकर पूर्ण होईल. मात्र, प्रत्यक्षात सुकाणू समितीमार्फत सर्व महत्त्वाचे निर्णय शिक्षण आयुक्तच घेणार असतील, तर परीक्षा परिषद केवळ सदस्य व अंमलबजावणी करणारी संस्था ठरणार का, असा प्रश्न उपस्थित होतो.

# 'महाराष्ट्र पोलीस रेजिंग डे', मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात विद्यार्थ्यांचा उत्साह

### 'मिशन उडान' शस्त्रास्त्रांची दिले ज्ञान.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**



महाराष्ट्र पोलीस दलाच्या वर्धापन दिनाचे पोलीस रेजिंग डे औचित्य साधून आज, २ जानेवारी २०२६ रोजी, मूर्तीजापूर ग्रामीण पोलीस स्टेशन येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी एका विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अकोल्याचे पोलीस अधीक्षक मा. अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमात 'अॅकेडमीक हाईट पब्लिक स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. खाकी वर्दीतील मित्रः पोलीस ठाण्याचे कामकाज अनुभवले कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनच्या दैनंदिन कामकाजाची सविस्तर माहिती देण्यात आली. गुन्ह्याची नोंद कशी केली जाते, वायरलेस संदेश यंत्रणा कशी चालते आणि सामान्य नागरिकांना मदत मिळवून देण्यासाठी पोलीस कशा प्रकारे कार्यरत असतात, हे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहून समजून घेतले.

विद्यार्थ्यांसाठी सर्वात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले ते पोलिसांनी वापरल्या जाणाऱ्या विविध शस्त्रांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच, युवकांच्या स्वप्नांना दिशा देणाऱ्या 'मिशन उडान' उपक्रमाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. भविष्यात पोलीस दलात किंवा स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून करिअर कसे घडवावे, याचे मोलाचे धडे यावेळेस देण्यात आले.

महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येणारी 'रक्षा/सेवा प्रणाली' आणि 'दामिनी पथका'च्या कार्याची माहिती यावेळेस देण्यात आली.

संकटकाळी तत्काळ मदत मिळवण्यासाठी 'डायल ११२' या हेल्पलाईन क्रमांकाचा वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मनात पोलीस दलाविषयी असलेली भीती दूर होऊन विश्वास निर्माण व्हावा आणि त्यांना कायद्याचे प्राथमिक ज्ञान मिळावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

पोलीस प्रशासन, मूर्तीजापूर या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पोलीस दलाविषयी कुतूहल आणि आदर पाहायला मिळाला. शाळेचे शिक्षक तांबडे सर,व ठाणेदार श्रीधर गुट्टे, पीएसआय मनिषा सामतकर,ए.एस आय संजय खंडारे,पो हे कॉ.नितीन वडतकर, ज्ञानेश्वर रडके,अंकीता मुंडे,पो कॉ.गणेश ठाकरे, प्रशांत भावाने,शंकर खेडकर, सोनल इत्यादी पोलीस कर्मचारी मोठ्या संख्येने या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## बनावट गुटख्याचा कारखाना

**▸विदर्भ केसरी। छत्रपती संभाजीनगर :**

पडेगावच्या निर्मनुष्य परिसरात भाडेतत्त्वावर घर घेऊन पूर्वी गुटखा व अन्य प्रतिबंधित सुगंधी सुपारीची विक्री करणाऱ्याने जीवघेण्या बनावट गुटख्याचा कारखानाच उघडला होता.३१ डिसेंबर रोजी रात्री गुन्हे शाखेने त्याच्या या कारखान्यात धाड टाकून शेख इर्शाद शेख शहेजाद (३५, रा. हर्सुल, जटवाडा) याला अटक केली. तसेच कच्चा माल व यंत्रसाम्रगी जप्त केली. काही महिन्यांपासून मुंबईतील एक गुटखा तस्कर शहरात येऊन बनावट गुटखा तयार करुन घेऊन जात असल्याची माहिती गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक गजानन कल्याणकर, पोलिस उपनिरीक्षक जगन्नाथ मेनकुदळे यांना प्राप्त झाली होती.

# कारचा अपघात : चालक सुखरूप



**▸विदर्भ केसरी। गिरड:**

उमरेड हिंगणघाट मार्गावरील वडगाव पाटी जवळ कारचा अपघात झाला या अपघातात कार चालक सुदैवाने सुखरूप बचावला असून कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

प्राप्त माहितीनुसार २ जानेवारीला दुपारी २ वाजताच्या सुमारास कार चालक माणिक मेंढे मारेगाव कार क्रमांक एम एच ४९ यु ३५०१ ने.गिरड कडे येत असताना वडगाव पाटी जवळ क्रेन घेऊन जाणारा ट्रक अचानक वडल्यान ट्रकची कारला धडक लागली यावेळी गिरड येथील सामाजिक कार्यकर्ते तुषार गिरडे यांनी चालका जोरात आवाज दिल्याने मोठा अनर्थ टळला.

या अपघातात सुदैवाने कार चालक सुखरूप बचावले असुन कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे घटनेची माहिती मिळताच गिरड पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला असून पुढील तपास पोलीस करीत आहे

# सहाय्यक पोलीस अधीक्षकांचा सत्कार

### महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमित्य माणुसकीची भिंत पुसद कडून सत्कार.....

**▸विदर्भ केसरी। विजय निखाते**



**पुसद** आज दिनांक 2 जानेवारी 2026 आजच्याच दिवशी म्हणजे 2 जानेवारी 1961 रोजी भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री स्व.पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र पोलीस दलाचा ध्वज पोलीस दलाकडे प्रदान केला. या दिवसापासून 2 जानेवारी हा दिवस पोलीस स्थापना दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधुन पुसद येथील माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन पुसद, मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्था पुसद यांचे वतीने सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद कार्यालयामध्ये माननीय श्री हर्षवर्धन बी. जे (IPS) साहेब यांचा मानचिन्ह व वृक्ष देऊन सत्कार करण्यात आला. व त्यांना महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या या प्रसंगी त्यांनी माणुसकीच्या भिंतीच्या कामाचे कौतुक केले. व माणुसकीच्या भिंतीला भेट देण्याचे आश्वासन दिले.. यावेळेस उपस्थित मान्यवर माणुसकीच्या भिंतीचे अध्यक्ष गजानन जाधव,अनंता चतुर,मधुकर चव्हाण,दिगंबर देशमुख ग्रीन मिशनचे अध्यक्ष रमेश डंबोंळे,पवन बोजेवार,देविदास खंदारे,प्रमोद ठाकूर,आदित्य जाधव,उपस्थित होते

# स्व. गुलाबसिंग ठाकूर यांना स्मृतिदिनानिमित्त वारकरी संप्रदाय व विद्यार्थ्यांकडून अभिवादन

**▸विदर्भ केसरी। ढाणकी (प्रतिनिधी): मिलिंद चिकटे**





येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय गुलाबसिंगजी ठाकूर यांच्या ४८ व्या स्मृतिदिनानिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने वारकरी संप्रदायाने स्वर्गीय ठाकूर यांच्या प्रतिमेची भव्य दिंडी काढली होती.

स्वर्गीय गुलाबसिंग ठाकूर यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी काढण्यात आलेल्या या फेरीत वारकरी संप्रदायाचे भजनी मंडळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कस्तुरबा गांधी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनी, शिक्षक आणि कर्मचारी यांनी या फेरीत सहभाग घेऊन शिस्तबद्ध संचलन केले. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि "विठ्ठल-विठ्ठल" च्या जयघोषात निघालेली ही फेरी शहराचे मुख्य आकर्षण ठरली.

फेरीनंतर कस्तुरबा गांधी कन्या विद्यालयामध्ये एक छोटेखानी कार्यक्रम पार पडला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय ठाकूर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. या प्रसंगी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ . लक्ष्मण रावते, ढाणकीच्या नगराध्यक्षा अर्चना वासमवार आणि बिटरगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव आनंद शेवाळकर, सहसचिव किशोर ठाकूर, रमण रावते, रमेश पांडे, संभाजी उपेवाड, केशव बिरबलवाड, संभाजी ताटीकुंडलवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कस्तुरबा गांधी कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका शारदा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. स्वर्गीय गुलाबसिंग ठाकूर यांनी शिक्षण क्षेत्रात घातलेल्या पायाभरणीमुळेच आज परिसरातील हजारो विद्यार्थी ज्ञानार्जन करत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. मान्यवरांच्या मार्गदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक **विदर्भ केसरी** विदर्भाचा मानबिंदू

शनिवार, ३ जानेवारी २०२६ | २

GOOD MORNING
# कॉटनसिटी



!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

### अपघातात युवकाचा जागीच मृत्यू

दारव्हा : ट्रक व दुचाकी अपघातात युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना येथील दिग्रस बायपासवर बुधवारी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. रोहन रमेश मोहिते (वय १९, रा. टिळकवाडी, दारव्हा) असे मृताचे नाव आहे. रोहन हा मित्रासह दुचाकीने जात होता. यावेळी ट्रकने धडक दिल्याने रोहन गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. अपघातानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला, युवकाचा मृतदेह रुग्णालयात पाठविला.

## संक्षिप्त...

### संताजी स्नेही तेली समाज फॉउंडेशन ग्रुप द्वारा वधू वर परिचय मेळावा संपन्न

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



तेली समाजातील सामाजिक राजकीय आर्थिक शैक्षणिक व कौटुंबिक प्रश्न सोडविण्यासाठी अनेक समस्या निर्माण होतात. परंतु सामाजिक प्रश्न हा मुला मुलीच्या आई वडिलांना भेडसावनारा असून तो आई वडिलांच्या जीवनातील जटील प्रश्न असून तो सोडवीतांना आई बडिलांचा कधी कधी नाईलाज असतो तेली समाजातील मुला मुलीच्या आई वडिलांचा जिव्हाळाचा प्रश्न सोडविण्यासाठी संताजी स्नेही तेली समाज फॉउंडेशन ग्रुप यवतमाळ द्वारा गेली ३ वर्षांपासून वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजण करण्यात येतं आहे कारण समाजात मुला व मुलीचे जे एज्यूकेशन मध्ये दरी वाढत आहे त्या मुळे मुलांच्या आई वडिलांना मुलाचे लग्न जुळण्या करता अनेक खस्ता खाव्या लागतं आहे. हा सामाजिक जटील प्रश्न सोडविण्या करीता दिनांक २८/१२/२५ला यवतमाळ उत्सव मंगल कार्यालय येथे वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले सदर परिचय मेळाव्याला उस्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून या परिचय मेळाव्याच्या माध्यमातून लग्न जुळण्याचा योग येतं आहे. या परिचय मेळाव्याची यशस्वी कडे वाटचाल असून सदर मेळाव्यात नागपूर अहिल्यानगर नांदेड नागपूर चंद्रपूर भंडारा गोंदिया वर्धा अमरावती अस्या अनेक जिल्हातून वधू वराचे पालक वर वधू उपस्थितीत होते. सदर मेळाव्यात मुला मुलींनी आपला परिचय करुन दिला सदर परिचय मेळाव्यात बंधन नात्याचे या परिचय पुस्तिकेचे प्रकाशन मा. आमदार बाळासाहेब मांगूळकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले सदर मेळाव्यात नवनिर्वाचित नगर सेविका सौ. साधना विनोद काळे व सौ. प्रियंका चेतन भवरे यांचा शाल श्रीफळ वृक्ष देवून मा. बाळासाहेब यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. सदर मेळावा गेली ३ वर्षा पासून यशस्वी करण्या करिता संताजी स्नेही तेली समाज फॉउंडेशन ग्रुपच कोर कमिटीचे अध्यक्ष डॉक्टर मंगेशभाऊ रुईकर उपाध्यक्ष सेवा निवृत्त अभियंता अशोकराव ढवळे कोषाध्यक्ष प्रकाश उरकुडे सचिव सेवानिवृत्त अभियंता विलास चावरे कोर कमिटीचे सदस्य किशोर डंभारे किशोर थोटे प्रा. सुनील डंभारे डॉक्टर संजय पारधी प्रशांत रोकडे अनिल जीपकाटे सुहासराव आखरे प्रकाशराव मुडे प्रा.रंगराव लांजेवार प्रा. राहुल साखरकर विशाल ठोबरे संजय बारी डॉक्टर राडे मोहन नंदुरकर संदीप पिंपळकर ज्ञानेश्वर रायमल पुरुषोत्तम पावडे चंद्रशेखर कुंभलकर संताजी महिला विचार मंचच्या अध्यक्षा सौ.जयश्रीताई मंगेश रुईकर विद्याताई ढवळे सौ वंदना विलास चावरे सौ.पूजा दिपक उरकुडे सौ. संगीता दिलीप देशमुख सौ.संजीवनी एस. बारी सौ.संगीता सुहास सावरकर प्रा. मनीषा सुनील डंभारे सौ.मनीषा मलकापुरे सौ विद्या किशोर डंभारे सौ सोनाली मोहन नंदुरकर सौ. मीनल पाटील संताजी महिला विचार मंचच्या सदश्यानी भाग घेवून कार्यक्रम यस्ववी करण्या करीता परिश्रम घेतले कार्यक्रमाचे अध्यक्ष सेवा जेष्ठ नागरीक देवरावजी जीपकाटे प्रमुख अतिथी रामदास पाटील व सेवा जेष्ठ महिला सौ. उज्वला सुरेश घोसले श्रीमती उज्वला हनुमंत वानोडे हया लाभल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अभियंता विलास चावरे व सौ संजीवनी संजय बारी यांनी केले तर कार्यकमाची प्रस्तावना डॉक्टर संजय पारधी यांनी केले समाजाच्या सामाजिक व कौटुंबिक समश्या वर डॉक्टर मंगेश भाऊ रुईकर यांनी विषय मांडले. सदर मेळाव्यात स्टेज सजावट साउंड सिस्टम अर्चित रुईकर व तुषार यांनी पहिले सुरुची भोजनाचा आस्वाद घेतल्या नंतर कार्यक्रमाची सांगता झाली

### राळेगावात आज रंगणार 'सुगंधा स्मृती व्याख्यानमाला'; वक्त्यांच्या विचारांची मेजवानी

**विदर्भ केसरी। राळेगाव (प्रतिनिधी):**



स्वर्गीय सुगंधा गोविंदराव तेलंगे यांच्या स्मृती प्रित्यर्थ, सुगंधा बहुउद्देशीय संस्था, झडगाव यांच्या वतीने आयोजित 'सुगंधा स्मृती पुरस्कार' आणि व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प उद्या, शनिवार दि. ३ जानेवारी रोजी गुंफले जाणार आहे. राळेगाव येथील प्रथम हॉस्पिटॅलिटी अँड अटोमोटिव ट्रेनिंग सेंटरमध्ये दुपारी ३ ते ५ या वेळेत हा सोहळा संपन्न होणार असून, परिसरातील नागरिकांना वैचारिक मेजवानी मिळणार आहे. या व्याख्यानमालेचे मुख्य आकर्षण मा. प्रशांत गावंडे (माजी प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यवतमाळ) हे राहणार आहेत. आपल्या प्रगल्भ अभ्यासपूर्ण शैलीत ते उपस्थितांशी संवाद साधणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राळेगावचे तहसीलदार मा. अमित भोईटे भूषविणार आहेत. तसेच या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राळेगाव पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक सौ. शितल मालटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश दंदे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते विनय मुनोत आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे संचालक आशिष इंगळे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. विविध प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या आणि स्मृतींना उजाळा देणाऱ्या या कार्यक्रमाला राळेगाव तालुक्यातील नागरिकांनी, युवकांनी आणि शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आय.आर.एस. (IRS) अनिल खडसे यांनी केले आहे

# 'त्या' संचालक मंडळाला अखेर दणका

## दलित व आदिवासी उद्धार शिक्षण प्रसारक मंडळ, मादनी येथील जुने संचालक मंडळ पूर्णतः बरखास्त

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



दलित व आदिवासी उद्धार शिक्षण प्रसारक मंडळ, मादनी (ता. व जि. यवतमाळ) या संस्थेतील बेकायदेशीर, मनमानी व नियमबाह्य कारभारावर अखेर कायद्याची कुऱ्हाड कोसळली आहे. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, यवतमाळ यांनी संस्थेचे जुने संचालक मंडळ पूर्णतः बरखास्त करण्याचा ठोस व निर्णायक आदेश पारित केला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील कलम 41-ड (41-D) अंतर्गत दिलेल्या आदेशांचे वारंवार उल्लंघन करत संचालक मंडळाने संस्थेचा कारभार बळकावल्याचे चौकशीत स्पष्ट झाले होते. विशेषतः चंद्रशेखर दादाराव मडावी हे स्वतःला संस्थेचे मालक असल्याप्रमाणे वागत आर्थिक व प्रशासकीय स्वरूपाचे गंभीर गैरप्रकार करत असल्याच्या अनेक तक्रारी दाखल होत्या.

या पार्श्वभूमीवर संस्थेच्या सहसचिव सौ. जनाबाई बाबाराव राठोड यांनी 29 जानेवारी 2024 रोजी सहाय्यक धर्मदाय आयुक्त, यवतमाळ यांच्याकडे रीतसर अर्ज सादर करून जुने संचालक मंडळ बरखास्त करून नवीन संचालक मंडळाची परिशिष्ट-१ नोंद घेण्याची मागणी केली होती.

या अर्जावर सविस्तर चौकशी व सुनावणी करून 15 डिसेंबर 2025 रोजी सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांनी जुने संचालक मंडळ पूर्णतः बरखास्त करत नवीन संचालक मंडळाची नोंद घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच नवीन संचालक मंडळाच्या नोंदणीसाठी 30 दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे.

या निर्णयाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेस सौ. जनाबाई बाबाराव राठोड, धनराज बाबाराव राठोड, स्वप्निल विठ्ठलराव निकुरे, देवयानी स्वप्निल निकुरे, नीलिमा बाबाराव राठोड, गजानन भोकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### त्यांना कोणताही अधिकार नाही – स्पष्ट आदेश

- **या आदेशानंतर चंद्रशेखर दादाराव मडावी व त्यांच्या जुन्या संचालक मंडळाचा संस्थेवर कोणताही कायदेशीर, प्रशासकीय अथवा आर्थिक अधिकार उरलेला नाही, असे सहाय्यक धर्मदाय आयुक्तांनी स्पष्टपणे नमूद केले आहे.**
- **संस्थेच्या नावाने चंद्रशेखर दादाराव मडावी यांच्याशी कोणताही आर्थिक व्यवहार, करार, देणगी किंवा अन्य व्यवहार करू नये, असेही आदेशात ठामपणे सांगण्यात आले आहे. अशा प्रकारच्या व्यवहारास संस्थेची कोणतीही मान्यता राहणार नसून, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.**

### गंभीर आरोपांची मालिका

- **चंद्रशेखर दादाराव मडावी यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार विश्वस्त चोरी बेकायदेशीररीत्या अध्यक्ष पद बळकावणे विविध न्यायालयीन गुन्हे दाखल असे गंभीर आरोप असून, या सर्व बाबींची दखल घेत अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग, अमरावती यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांना आवश्यक निर्देश दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे**

## स्नेहमीलन सोहळा व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

**विदर्भ केसरी। यवतमाळ :**




नववर्षाच्या मंगलमय शुभारंभानिमित्त भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) व सखी समर्पण, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्नेहमीलन सोहळा व नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार समारंभ उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला. हा कार्यक्रम यवतमाळ येथील महासंघाच्या कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय कांबळे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून महासंघाचे अमरावती विभागीय अध्यक्ष विजय कुमार बुंदेला उपस्थित होते. प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष डॉ. दिपक घरझोडे यांनी महासंघाच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देत पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी विभागीय अध्यक्ष विजय कुमार बुंदेला यांनी समाजकार्याची आजची गरज, स्वयंसेवी संस्थांची समाजातील भूमिका व संघटित प्रयत्नांतून होणाऱ्या सकारात्मक बदलांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्ष कु. प्रियदर्शनी उईके यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक बिपीनभाऊ चौधरी, डॉ. नीरजभाऊ वाघमारे, भारतभाऊ ब्राह्मणकर, आकाश पर्तेकी व विपुल खोब्रागडे यांचा शाल, पुष्पगुच्छ व ग्रामगीता देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. यानंतर नगराध्यक्ष कु. प्रियदर्शनी उईके व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. संजय कांबळे यांच्या हस्ते महासंघाच्या नवनिर्वाचित विभागीय व जिल्हा स्तरावरील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्ष व नगरसेवकांनी महासंघाच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत भविष्यात सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात डॉ. संजय कांबळे यांनी महासंघाच्या ध्येय-धोरणांची माहिती देत महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या "समृद्ध महिला प्रकल्प" या उपक्रमावर सविस्तर प्रकाश टाकला. महिलांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक सबलीकरण हे महासंघाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाध्यक्ष डॉ. दिपक घरझोडे, उपाध्यक्ष किशोर बाभुळकर, प्रतीक तराळकर तसेच सखी समर्पण, यवतमाळ चे मार्गदर्शक ॲड. पंकज ओसवाल, संयोजिका दुर्गा मिश्रा, नवनियुक्त अध्यक्ष डॉ. कल्पना कुलरे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विजय कुमार बुंदेला यांनी केले. कार्यक्रमानंतर विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले असून स्नेहभोजनाने स्नेहमीलन सोहळ्याची सांगता झाली. या कार्यक्रमामुळे नववर्षाच्या प्रारंभी सामाजिक ऐक्य, सहकार्य व सकारात्मक ऊर्जेचा संदेश मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## आज शारीरिक शिक्षण दिन यवतमाळात

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

शिक्षण व सहकार महर्षी बाबाजी दाते यांनी स्थापन केलेल्या विशुद्ध विद्यालय संस्थेतील घटक संस्थांचा संयुक्त शारीरिक शिक्षण दिन शनिवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता शारीरिक शिक्षण महाविद्यालय (दाते बीपीएड्) उमरसरा येथील भव्य प्रांगणात आयोजित केला आहे.

विशुद्ध विद्यालय व वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टचे अध्यक्ष विनायक दाते यांच्या अध्यक्षतेत संपन्न होत असलेल्या या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तर प्रमुख पाहुणे म्हणून ४७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी चे कमांडिंग ऑफिसर कर्नल अनूप नायर उपस्थित राहतील.

विशुद्ध संस्थेच्या उपाध्यक्ष विद्याताई केळकर, वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टच्या उपाध्यक्ष सुषमा दाते, दोन्ही संस्थांचे सचिव विजय कासलीकर, कोषाध्यक्ष मंगेश केळकर, विशुद्ध संस्थेच्या सहसचिव मीरा केळकर, वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टचे सहसचिव अजय पाटणकर तथा समस्त कार्यकारी मंडळ व सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास सर्व घटक संस्थांचे विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, क्रीडाप्रेमी रसिकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन घटक संस्थांचे प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले आहे.

## विजेच्या धक्क्याने युवकाचा मृत्यू

**विदर्भ केसरी। दिग्रस**



मृतक - सचिन राठोड

तालुक्यातील वरंदळी येथे घरात विद्युत धक्का लागून २२ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास घडली. सचिन विठ्ठल राठोड (२२, रा. वरंदळी, ता. दिग्रस) असे मृतकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सचिन हा राहत्या घरात असताना अचानक ओरडण्याचा आवाज आला. त्यामुळे कुटुंबीयांनी धाव घेतली. त्यावेळी तो विद्युत वायरला चिकटलेला दिसून आला.तत्काळ घरातील विद्युत पुरवठा बंद करून त्यास उपचारासाठी वसंतनगर प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र तेथील मुख्य गेट बंद असून, कोणताही वैद्यकीय अधिकारी उपस्थित नव्हता. यानंतर तातडीने रुग्णवाहिका बोलावून त्यास दिग्रस ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून सचिन यास मृत घोषित केले. मृतकाच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ व एक बहीण असा परिवार आहे.

वरंदळीपासून अवघ्या अर्धा किलोमीटर अंतरावर वसंतनगर प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. तेथे आपत्कालीन रुग्णांवर उपचार होत नसल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

## लोही ग्रामीण रुग्णालयास रामनगर भागातून प्रवेशद्वार देण्याची मागणी प्रलंबित

**विदर्भ केसरी। दारव्हा**

लोही (ता. दारव्हा) : लोही येथील ग्रामीण रुग्णालयाला रामनगर भागातून स्वतंत्र प्रवेशद्वार देण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींनी केली असून याबाबत ग्रामपंचायत लोही, लोही यांनी अधिकृत ठराव मंजूर करून तो जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे पाठविला आहे. मात्र अद्यापपर्यंत या मागणीवर कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.

सध्या रुग्णालयाचा मुख्य प्रवेशद्वार लांब अंतरावर असल्याने रामनगर व परिसरातील नागरिकांना,



विशेषतः वृद्ध, महिला, गरोदर माता व आपत्कालीन रुग्णांना रुग्णालयात पोहोचण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वेळेअभावी अनेकदा उपचारात विलंब होत असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे या संदर्भात मुंबई येथे कार्यरत असलेले स्विय सहाय्यक राजू काळे यांनी प्रकरणाचा पाठपुरावा करत विधान परिषद आमदार प्रवीण पोटे यांच्याकडे मागणी मांडली असून आमदार पोटे यांनी आरोग्य विभाग, मुंबई यांना पत्र दिले आहे. त्या पत्रावर सध्या कार्यवाही सुरू असल्याची माहिती आहे. रामनगर भागातून स्वतंत्र प्रवेशद्वार उपलब्ध झाल्यास रुग्णवाहिकांना जलद प्रवेश मिळेल, रुग्णसेवा अधिक सुलभ होईल तसेच नागरिकांचा अनावश्यक त्रास कमी होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

> **"रामनगर भागातून लोही ग्रामीण रुग्णालयात थेट प्रवेशद्वार असणे ही केवळ मागणी नसून नागरिकांची अत्यावश्यक गरज आहे. वृद्ध, महिला, गरोदर माता व आपत्कालीन रुग्णांना सध्या मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याबाबत ग्रामपंचायत लोहीने अधिकृत ठराव मंजूर करून तो जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे पाठविला आहे. मात्र अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. प्रशासनाने जनहित लक्षात घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा."**
> **— राजू हळदे, उपसरपंच, ग्रामपंचायत लोही**

### राज्यस्तरीय फ्लोअरबॉल स्पर्धेत यवतमाळच्या मुलांनी मारली बाजी; 'कांस्य' पदकावर कोरले नाव

# यवतमाळ जिल्ह्याला ब्रॉंस पदक



**विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ, दि. १ जानेवारी : फ्लोअरबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेखाली आयोजित राज्यस्तरीय फ्लोअरबॉल अजिंक्यपद स्पर्धा नुकतीच भंडारा येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात पार पडली. या स्पर्धेत यवतमाळ जिल्हा फ्लोअरबॉल संघाने मुलांच्या गटात तृतीय क्रमांक पटकावत ब्रॉंस पदकावर आपले नाव कोरले.

तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात यवतमाळ विरुद्ध गोंदिया यांच्यात चुरशीची लढत झाली. या सामन्यात यवतमाळ जिल्हा संघाने ३–० अशा गोलफरकाने विजय मिळवत कांस्य (ब्रॉंस) पदकाची कमाई केली.

या यशस्वी संघात कर्णधार कार्तिक गायकवाड, ओम पाली, दर्शन चव्हाण, नेव्हील शुक्ला, अंश मडसे, अनिकेत पानसद, श्रेष्ठ माहुरे, आदित्य चौधरी, आयुष्य गायकवाड यांचा समावेश होता. संघाचे व्यवस्थापक व प्रशिक्षक गजानन मुकणर यांनी संघाचे मार्गदर्शन केले.

बक्षीस वितरण समारंभात फ्लोअरबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव रविंद्र चौथवे, दिपक वाडे तसेच भंडारा फ्लोअरबॉल असोसिएशनचे सचिव यांच्या हस्ते विजेत्या संघाला करंडक व खेळाडूंना ब्रॉंस मेडल प्रदान करण्यात आले.

या उल्लेखनीय यशाचे श्रेय यवतमाळ जिल्हा फ्लोअरबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अमोल बोदडे, उपाध्यक्ष मनोज येंडे, सचिव व क्रीडा मार्गदर्शक जितेंद्र सातपुते, सहसचिव सचिन भेंडे यांच्यासह आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू आकाश चिकटे, एम. एन. मिर, पियुष भुरचंडी, अविनाश लोखंडे, आनंद भुसारी, अजय मिरकुटे, जगदीश जागीड, संजय कोल्हे, क्रीडा अधिकारी सचिन हरणे, प्रथमेश ठोकळ, विकी गिरी, खुशी गायकवाड तसेच आजी-माजी फ्लोअरबॉल खेळाडूंना देण्यात आले. संघाच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### मान्यवरांच्या हस्ते गौरव

- **बक्षीस वितरण समारंभात फ्लोअरबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव रवींद्र चौथवे आणि दीपक वाडे यांच्या हस्ते विजेत्या संघाला करंडक व खेळाडूंना पदके प्रदान करण्यात आली. या यशाचे श्रेय जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष अमोल बोदडे, सचिव जितेंद्र सातपुते यांच्यासह आंतरराष्ट्रीय हॉकीपटू आकाश चिकटे व इतर मार्गदर्शकांना देण्यात आले आहे.**

## रविवारी शहरात यवतमाळ हेल्थ मॅरेथॉन

**विदर्भ केसरी।**

**यवतमाळ** कॉटनसीटी रनर्स फाऊंडेशनच्या पुढाकारातून यवतमाळ जिल्हा पोलिस दलाचे विशेष अभियान ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत जिल्हा प्रशासन, नगर पालिका प्रशासन, शारीरिक शिक्षक संघटना, जिल्हा श्रमिक पत्रकार संघ यांच्या सहभागातून आयोजित करण्यात आले. यवतमाळ हेल्थ मॅरेथॉनचे आयोजन रविवार दि.४ जानेवारी रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथून सकाळी ६ वाजता करण्यात आले आहे. यंदा हजारावर यवतमाळकर सुदृढ आरोग्याचा संदेश देत मॅरेथॉनमध्ये धावणार आहेत.

यासंदर्भात गुरूवार दि. १ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता मंथन सभागृहात पार पडलेल्या पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. या वेळी पोलिस अधीक्षक कुमार चिंता, कॉटन सिटी रनर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. परेश गंडेचा, सचिव डॉ. शरद राखुंडे, कोषाध्यक्ष डॉ. उमेश जोगे उपस्थित होते. सकाळी ५ वाजता मैदानावर हजर राहावे, असे कळवले आहे.




- **धावपटूंकरिता दर १ ते १.३० किमी अंतरावर हायड्रेशन व न्यूट्रिशन पॉइंट्सची सुविधा राहील. मनोरंजन व प्रोत्साहनासाठी मार्गावर ठिकठिकाणी ताशा, ढोलपथक, पोलिस बँड, डीजे, शालेय बँड मार्गावर ठिकठिकाणी असणार आहेत. संपूर्ण मार्गावर ४ रुग्णवाहिका दर २ किमी अंतरावर १० डॉक्टरांची ५ वैद्यकीय पथके, स्टेडियम परिसरात स्वतंत्र मेडिकल टीम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, संजिवनी हॉस्पिटल क्रिटिकीयेर हॉस्पिटल, दत्त हॉस्पिटल येथे बेड उपलब्ध राहणार आहे. हृदयरोग तज्ञ डॉ. सतीश चिरडे हे रुग्णसेवेसाठी संपूर्ण कार्यक्रमादरम्यान उपलब्ध राहणान आहेत. रननंतर कॅम्पसव दुखापतींसाठी ४० फिजिओथेरपिस्ट्सची टीम तैनात राहणार आहे.**

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
शनिवार, ३ जानेवारी २०२६ | २

GOOD MORNING
# अकोला+वाशिम
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!



## युतीचे १२ उमेदवार बिनविरोध

■ : सत्ताधारी भाजपा-शिंदेसेना युतीने राज्यात होत असलेल्या महापालिका निवडणुकीमध्ये विजयाचे खाते उघडले आहे. अर्ज माघारी घेण्याची मुदत संपल्यानंतर अनेक ठिकाणी भाजपाचे दोन अंकी उमेदवार बिनविरोध विजयी झाले. तर शिंदेसेनेचे उमेदवारही बऱ्याच ठिकाणी बिनविरोध विजयी झाले आहेत. जळगावमध्ये युतीने १२ जागांवर बिनविरोध विजय मिळवला आहे.

## नवी उमेद, नवे वर्ष!



अमरावतीचे खासदार बळवंतभाऊ वानखडे यांच्या हस्ते 'दैनिक विदर्भ केसरी' २०२६ च्या दिनदर्शिकेचे विमोचन संपन्न झाले. विदर्भाच्या प्रगतीचा आणि लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा बुलंद आवाज म्हणजे दैनिक विदर्भ केसरी!

## संक्षिप्त...



### अमरावतीचे बेलोरा विमानतळ एप्रिलपासून नाईट लँडिंग साठी सज्ज

**▸विदर्भ केसरी। अमरावती :**

बेलोरा विमानतळ एप्रिल २०२६ पासून नाईट लँडिंग साठी सज्ज असणार आहे. कोणती विमान कंपनी रात्रीला विमानांची सेवा देणार हे विमानतळ प्राधिकरण ठरविणार आहे. ३१ मार्चपर्यंत नाईट लँडिंग संबंधित एकूणच कामे पूर्णत्वास नेण्यात येणार असल्याची माहिती आहे. हल्ली बेलोरा विमानतळ येथून 'नाईट लैंडिंग' सुविधा व्हावी, अशी अमरावतीकरांची मागणी यानिमित्ताने पूर्णत्वास जाणार आहे. बेलोरा (अमरावती विमानतळ) येथे डॉपलर व्हेरी हाय फ्रिक्वेन्सी ओमनी डायरेक्शनल रेंज (डीव्हीओआर) यंत्रणा बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. ही यंत्रणा उभारण्यासाठी आवश्यक बांधकाम पूर्ण झाले असून डीजीसीएचे एक पथक दोन आठवडे आधी पाहणी करून परत गेले आहे. या चमुने सिव्हिल वर्कची पाहणी केली असता बेलोरा विमानतळ हे नाईट लँडिंग साठी सज्ज असल्याचे स्पष्ट केले. येत्या आठवड्यात डीजीसीएचे अभियांत्रिकी तसेच तंत्रज्ञांचे पथक बेलोरा विमानतळावर दाखल होणार असून ते अँटेना तसेच आवश्यक यंत्रांची उभारणी करणार आहे. ही यंत्रणा इन्स्टॉल होण्यासाठी एक ते दीड महिन्यांचा कालावधी लागतो. यात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी वारंवार तपासणी व चाचणी घेतली जाते. तंत्रज्ञ चमूला ही यंत्रणा पूर्णपणे इन्स्टॉल झाल्याची खात्री पटते, त्यानंतर तिची प्रत्यक्ष चाचणी घेतली जाणार आहे. यंत्रणा व्यवस्थित असून ती अस्तित्वात आल्याचा परवाना हा डीजीसीएकडून घ्यावा लागतो. त्यामुळे डीजीसीएचे विशेष पथक यंत्रणेच्या अचूकतेची चाचणी घेईल. त्यांची पूर्ण खात्री झाल्यानंतरच परवाना मिळतो. त्यानंतरच रात्री विमानोड्डाण व लँडिंग सुरू होते. ही संपूर्ण प्रक्रिया दोन ते अडीच महिने चालणार आहे.

### उमेदवारांनी आमिषाला बळी पडू नये

**▸विदर्भ केसरी। मुंबई :**

मुंबई महापालिका निवडणुकीत उभ्या राहिलेल्या मनसेच्या ५३



उमेदवारांनी सकाळी शिवतीर्थ निवासस्थानी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. कितीही आमिषे आली तरी त्याला बळी पडू नका. मलाही अनेक ऑफर आल्या होत्या. मात्र, ऑफर देणा-यांना मी पळवून लावले होते. विजयी होण्यासाठी पराक्रमाची पराकाष्ठा करा, असा सल्ला राज यांनी उमेदवारांना दिला. शिवतीर्थावर सर्व उमेदवारांचे शर्मिला ठाकरे यांनी औक्षण केले. यानंतर उमेदवारांना मार्गदर्शन करताना मुंबई मराठी माणसाची आहे. तिला व मराठीला वाचविण्यासाठी आपल्याकडे ही शेवटची संधी आहे, असे राज म्हणाले. बोगस मतदान होण्याची शक्यता असल्याने प्रत्येक बूथला मनसेचे १० कार्यकर्ते उभे करा. बोगस मतदार सापडला तर त्याला तिथेच फटकवून काढा. निवडणुकीत अनेक ऑफर येतील. पैशाचे आमिष दाखविले जाईल. पण, त्याला बळी न पडता मुंबई वाचवायची आहे हे लक्षात ठेवा, असे राज यांनी सांगितले.

# गौणखनिजा विरोधात महसूल ईन ॲक्शन

## विविध पथके स्थापीत ; दिवसासह रात्रीही पासेसची तपासणी

**▸विदर्भ केसरी। परतवाडा**

**महसुल विभागाने रेती चोरी व विना पासेस गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्यां विरोधात मोहीम उघडली आहे. विविध पथके स्थापित केले असुन दिवसासह रात्री उशीरापर्यंत वाहनचालकांकडून रायल्टी तपासणी करण्यात येत आहेत.व विनापासेस असलेल्या वाहनावर कारवाऱ्या केल्या जात असल्याचे चित्र आहे.**



अचलपूर तालुक्यात गेल्या काही वर्षांमध्ये वाढलेल्या रेती चोरीच्या घटना व विनापासेस कीवा क्षमते अधिक गौनखनिज वाहतूक बघता महसूल विभागाकडून सुरू असलेले प्रयत्न आता गतिमान व अधिक सक्षमपणे सुरू केले आहे. नुकताच तहसीलदार पदाचा पदभार स्वीकारलेल्या सुदर्शन सहारे यांनी या संदर्भात बैठक घेऊन योग्य त्या सूचना केल्यात.तसेच रेती चोरीच्या घटना व विनापासेस कीवा क्षमते अधिक गौनखनिज करणाऱ्यांची नाकेबंदी करण्याकरिता विविध चेकपोस्ट २४ तास वॉच ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत तहसीलदार यांनी दिलेल्या सूचनानंतर सध्या चेक पोस्टवरील पथकाद्वारे सकाळपासुन मध्यरात्री सुद्धा रॉयल्टी तपासणी ला वेग आला आहे. त्यामुळे अचलपूर तालुक्यात अवैध गौन खनिज वाहतुकीला आळा बसण्याच्या दृष्टीने महसूल विभागाने अधिक सक्षमपणे पावले उचलली असल्याचे बोलले जात आहे.

> ■ तालुक्यातील बैतूल नाका, ठोकबड्डा , अचलपूर नाका अशा तीन चेकपोस्टची निर्मिती करून येथे बैठे पथके चोवीस तास कार्यरत राहणार आहे.तर संयुक्त भरारी पथकाची वॉच राहणार आहे. या पथकांमध्ये नायब तहसीलदार, तलाठी, कोतवाल आदी अधिकारी कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

> ■ रीतसर परवाना घेऊनच गौन खनिज वाहतूक करावी तसेच मध्य प्रदेश रेती वाहतूक पास व महाराष्ट्र रायल्टी पास घेऊनच रेती व गौन खनिजाची वाहतूक करावी. पासेस क्षमतेपेक्षा अधिकची वाहतूक करू नये. नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करावे.
> सुदर्शन सहारे, तहसीलदार अचलपूर

# उद्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे रणशिंग, 'मेरा युवा भारत' उपक्रम

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

भारत सरकारच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयांतर्गत असलेल्या 'मेरा युवा भारत केंद्र, अकोला' आणि 'नेहरू युवा बहुउद्देशीय क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, कोकणवाडी' यांच्या संयुक्त विद्यमाने मूर्तिजापूर येथे भव्य तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून तालुक्यातील तरुण-तरुणींना आपले क्रीडा कौशल्य दाखवण्याची आणि जिल्हा स्तरावर मजल मारण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे.

दिनांक: ४जानेवारी २०२६ (रविवार)

वेळ: सकाळी १०:०० वाजता

स्थळ:तालुकाक्रीडासंकुल,मूर्तिजापूर

वयोगट: १५ ते २९ वर्षे (युवक व युवती)

या स्पर्धेत युवक आणि युवतींसाठी स्वतंत्र क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले आहे:

युवक: कबड्डी, गोळाफेक आणि १०० मीटर धावणे. युवती: खो-खो, गोळाफेक आणि १०० मीटर धावणे. बक्षिसे आणि संधी तालुका स्तरावर प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना जिल्हा स्तरीय स्पर्धेत खेळण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

प्रथम व द्वितीय क्रमांक: प्रमाणपत्र, मेडल आणि क्रीडा साहित्य. तृतीय क्रमांक: प्रमाणपत्र आणि मेडल. या स्पर्धेच्या निमित्ताने उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांकडून खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन मिळणार आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेऊन आपले व तालुक्याचे नाव लौकिक करावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी महेश सिंह शेखावत यांनी केले. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी किंवा नाव नोंदणीसाठी 'मेरा युवा भारत'चे तालुका समन्वयक विलास एम. वानखडे यांच्याशी संपर्क साधावा.

> **नोंदणीचे आवाहन**
> ■ "तालुक्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या संधीचा लाभ घेऊन आपले क्रीडा नैपुण्य सिद्ध करावे," असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी महेश सिंह शेखावत यांनी केले आहे. नाव नोंदणी आणि अधिक माहितीसाठी 'मेरा युवा भारत'चे तालुका समन्वयक विलास एम. वानखडे यांच्याशी संपर्क साधण्याचे कळविण्यात आले आहे.

# स्मशानभुमींचे सुशोभीकरण करा

## नगरसेविका प्रांजली गुल्हाने यांची मागणी : दफनभूमीसाठी घेतला पुढाकार



**▸विदर्भ केसरी। नांदगाव खंडे - तालुका प्रतिनिधी अमोल धवसे**


नांदगाव खंडेश्वर नगर पंचायतचे कार्यक्षेत्रातील स्थानिक शहरातील जवळ पास सर्वच हिंदू स्मशान भूमी,बौद्ध धर्म दफन भूमी, मुस्लिम कब्रस्तान दफन भूमी, येथील स्वच्छतेची अत्यंत वाईट स्थिती झालेली आहे.

जिकडे तिकडे घानिचे सामराज्य आहे. शहरातील स्मशान भूम्यांमध्ये घाण, झाडे झुडपे वाढुन तण आणि कचऱ्याने भरलेल्या आहे. ज्यामुळे त्या जागा अस्वच्छ झालेल्या आहे. शहरातील दफन भूम्या व स्मशानभूम्या ह्या आपल्या नांदगाव खंडेश्वर शहरातील सर्व जाती धर्मातील समुदायातील मृतांसाठी अंतिम विश्रांती स्थळ आहे. आणि त्यांचे पावित्र्य राखणे आपले कर्तव्य आहे. 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत, देशभरात स्वच्छतेवर भर दिला जात आहे.म्हणून, आपण या प्रकरणात लक्ष द्या आणि शहरातील सर्व दफन भूमी, स्मशान भूम्यांची,पूर्णपणे स्वच्छता,वाढलेले गवत झाडे झुडपे छटाई करुन साचलेला कचरा काढून टाकण्यासाठी त्वरित कारवाई करा. मोठ्या प्रमाणावर कचऱ्याची दुर्गंधी पसरते. रात्रीच्या वेळी या भागात पुरेसा प्रकाशही नसतो. येथे नियमित स्वच्छताही ठेवली जात नाही. यामुळे अनेकांची कुचंबणा होते.

तरी या प्रश्नाकडे नगरपंचायतीने गांभीर्याने लक्ष देऊन स्मशानभूमीची दुरुस्ती करून शुशोभीकरण करावे ; वाटल्यास आम्ही, यासाठी सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहोत. अशी मागणी नगरसेविका सौ.प्रांजली राहुल गुल्हाने यांनी लेखी निवेदनाव्दारे मुख्याधिकारी नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर यांच्या केली आहे.

> **लोकसहभागाचीही तयारी**
>
> 
>
> ■ नगरपंचायतीने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन स्मशानभूमीची दुरुस्ती आणि शुशोभीकरण करावे. आवश्यक असल्यास या कामासाठी आम्ही सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहोत, असेही सौ. प्रांजली गुल्हाने यांनी स्पष्ट केले आहे.

# नागपुरात हेल्मेटमध्ये निघाला नाग



**▸विदर्भ केसरी।**

नागपुरात थंडीमुळे हेल्मेटमध्ये विषारी नाग लपून बसल्याची घटना पुढे आली आहे. त्यामुळे घराबाहेर पडण्यापूर्वी डोक्याचे हेल्मेट, पायातील चप्पल किंवा बूट, कपडे आदी कोणतीही वस्तू एकदा तपासून किंवा झटकून घ्या असे म्हणण्याची वेळ आली आहे. ही घटना गत बुधवारी घडली. पण तिचा एक व्हिडिओ आज सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, नागपूर शहरातील सेमिनरी हिल परिसरातील मिताली चतुर्वेदी यांच्या कुटुंबात ही घटना घडली. मिताली यांनी आपले दुचाकीवरील हेल्मेट घरात ठेवले होते. बुधवारी दुपारी 2.30 च्या सुमारास त्यांना हेल्मेटमधून सापाचा फुत्कार ऐकू आला. त्यांनी घाबरून जवळ जाऊन पाहिले असता त्यांना हेल्मेटमध्ये कोब्रा जातीचा साप लपल्याचे आढळून आले. त्यांनी ही गोष्ट तत्काळ वन्यजीव संरक्षक शुभम जी. आर. यांच्या कानावर घातली. त्यानंतर शुभम यांनी तत्काळ मिताली यांच्या घराकडे धाव घेत या कुटुंबाला हेल्मेटमध्ये लपलेल्या विषारी नागापासून वाचवले.

# काही दिवसातच उखडला ४ कोटींचा डांबरी रस्ता ; मेळघाटात भ्रष्टाचार उघड

**▸विदर्भ केसरी। : प्रेमदास तायडे | मेळघाट**

चिखलदरा–धारणी तालुक्यात सुरू असलेल्या शासकीय विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असल्याचा गंभीर आरोप पुन्हा एकदा समोर आला आहे. धामणगाव गडी ते देवगाव, वस्तापूर, कुलंगणा, बदनापूर या मार्गावरील सुमारे ११ किलोमीटर लांबीचा, अंदाजे ४ कोटी रुपये खर्चाचा डांबरी रस्ता अवघ्या एका दिवसातच उखडून निघाल्याने संतप्त नागरिकांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला आहे. हा रस्ता धामणगाव गडी–देवगाव–खोगडा–ढाकणा–सावरया–बिजू–धावडी–मांडवा मार्गे धारणीला जोडणारा प्रमुख मार्ग असून, या रस्त्याने अनेक गावांचा संपर्क होतो. चिखलदऱ्याच्या पायथ्याशी असलेला हा मार्ग गेल्या अनेक वर्षांपासून चाळणीसारखा झाला होता. दोन आमदार बदलून गेले, मात्र रस्त्याची दुरवस्था कायमच राहिली होती.



अलीकडेच या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. मात्र अचलपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या जवळच्या ठेकेदाराला हे काम देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. संबंधित ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम करत, अक्षरशः रातोरात ११ किलोमीटरचा रस्ता डांबरीकरण केल्याने नागरिकांची झोप उडाली. अवघ्या एका दिवसात काम उरकून शासनाच्या ४ कोटी रुपयांच्या निधीला चुना लावण्यात आला की काय, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या प्रकरणाबाबत संतप्त व सुज्ञ नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, चिखलदरा व अचलपूर यांच्याकडे लेखी तक्रार केली. तक्रारीनंतर संबंधित विभागाचे अभियंते प्रत्यक्ष घटनास्थळी दाखल झाले. यावेळी नागरिकांनी अभियंत्यांच्या डोळ्यासमोरच रस्ता उखडून दाखवला. हाताने खरडले तरी डांबर निघत असल्याचे दृश्य पाहून अभियंत्यांनाही धक्का बसला. मेळघाटात अनेक ठिकाणी विनाअंदाजपत्रक (इस्टिमेट) रस्त्यांची कामे सुरू असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. "वाटेल तसे काम करा आणि अब्जावधी रुपये कमवा," अशीच परिस्थिती येथे निर्माण झाली असल्याचा संताप व्यक्त केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या ठेकेदाराविरोधात आमदार, खासदार किंवा कोणताही वरिष्ठ अधिकारी उघडपणे बोलण्यास तयार नसल्याने संशय अधिक गडद होत आहे.

> **"आंधळा दळतोय आणि कुत्रं पीठ खातंय**
> ■ "आंधळा दळतोय आणि कुत्रं पीठ खातंय," अशी अवस्था मेळघाटातील सार्वजनिक बांधकाम खात्याची झाली असल्याची तीव्र टीका नागरिकांकडून होत आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधित ठेकेदार व दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच सर्व रस्त्यांची कामे पुन्हा दर्जेदार पद्धतीने व मंजूर अंदाजपत्रकानुसार पूर्ण करावीत, अशी ठाम मागणी सुज्ञ नागरिकांनी केली आहे.

## भटक्या कुत्र्यांवरील अज्ञात रोगाच्या प्रादुर्भावामुळे नागरिक भयभीत ! : उपाययोजनांची मागणी

# मोकाट श्वानांचा नागरिकांच्या जिवाला घोर

**▸विदर्भ केसरी।राजकुमार चिंचोळकर**

बाळापूर : ग्रामीण भागात सध्याच्या परिस्थितीत भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास येत असुन भटक्या कुत्र्यांना लागन झालेल्या अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव नागरिकांना भेडसावत असल्याने नागरीकांमध्ये मोठ्या प्रमाणात भितीचे वातावरण पसरले आहे. तर सध्याच्या परिस्थितीत ग्रामीण भागात अनोळखी भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात निदर्शनास येत असून शहरी भागातील भटके कुत्रे पकडून ग्रामीण भागात रात्रीच्या



सुमारास सोडून दिल्या जात असल्याचे नागरिकांच्या कडून बोलल्या जात आहे. मोठ्या संख्येने असलेल्या भटक्या कुत्र्यांना मोठ्या प्रमाणात खाज खरुज तसेच जखमी अवस्थेत असलेल्या कुत्र्यांची संख्या अधिक प्रमाणात आहे. त्यामुळे नागरीक तसेच लहान शालेय विद्यार्थ्यांच्या अंगावर भटकी कुत्रे धावून येत असल्याने शालेय विद्यार्थ्यांना दुखापत झाल्याच्या घटना सुध्दा घडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात असलेल्या भटक्या कुत्र्यांना खाज खरुज तसेच अज्ञात रोगांची लागन असल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तालुक्यातील उरळ येथील बहुतांश नागरिकांच्या शरीरावर खाज सुटत असल्याची माहिती समोर येत आहे. या बाबतीत आझाद फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गोपाल पोहरे यांनी अलीकडेच जिल्हा पशुसंवर्धन विभाग तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कडे निवेदन सादर करण्यात येवून या गंभीर विषयाकडे लक्ष देण्याची मागणी करण्यात आल्याची माहिती आहे.

> **आरोग्य विभागाचे सर्वेक्षण सुरु**
> ■ या संदर्भात आरोग्य विभागाचे कार्यकारी यांनी उरळ गावात सर्वेक्षण करून नागरिकांना खाज खरुज ची लक्षणे तसेच या बाबतीत बाधीत रुग्ण आहेत का याबाबत सर्वेक्षण करून माहिती गोळा केली.
> ■ ग्रामीण मोठ्या प्रमाणात असलेल्या भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट दिवसेंदिवस वाढत आहे. खाज खरुज तसेच अज्ञात रोगांची लागन झालेल्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे गावात फिरणाऱ्या या कुत्र्यां पासून लहान मुलांना तसेच नागरिकांना संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे संमधीत विभागाकडून तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.
> -गोपाल पोहरे संस्थापक अध्यक्ष
> आझाद फाउंडेशन

# चिंचोना येथे बुद्धवन महोत्सव

## बुद्धमूर्ती प्रतिष्ठापना सोहळा संपन्न होणार

**▸विदर्भ केसरी। संघरतन सरदार/ विदर्भ केसरी**

सातपुड्याच्या पायथ्याशी बसलेल्या निसर्गरम्य बुद्धवन विपश्यना केंद्र ( निमखेड बाजार,ता. अंजनगाव सुर्जी) येथे आगामी ४ जानेवारी २०२६ रोजी भव्य बुद्धवन महोत्सव आणि ४ फुट उंचीच्या बुध्दमुर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा आयोजित करण्यात आला आहे. बोधिसत्व चॅरिटेबल ट्रस्ट आणि समता सैनिक दल शाखा अंजनगाव सुर्जी यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडणार असून परिसरातील बौद्ध उपासक उपासिका बांधवांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. या कार्यक्रमांमध्ये उद्घाटक मा. शरदजी चोरपगार (ca) नागपूर यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान माझी आमदार




भाऊरावजी तुळशीरामजी वानखडे भूषवणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून खासदार बळवंत भाऊ वानखडे आणि आमदार गजानन भाऊ लवटे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना आणि धम्मदेशना जागतिक शांतता पुरस्कार विजेते पु.भदंत करुणानंद महाथेरो (संभाजीनगर ) यांच्या शुभहस्ते सकाळी ९ वाजता पार पडेल. धार्मिक विधीसोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधनासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भव्य धम्मचर्चा रंगणार आहे. ज्याचे संचालन मा. राजीवजी जाधव साहेब करणार असून , पूज्य भिक्खू संघ मार्गदर्शन करतील या चर्चेसाठी अकोला, अमरावती वाशिम, बुलढाणा या जिल्ह्यातून अभ्यासक उपस्थित राहणार आहेत. महोत्सवासाठी येणाऱ्या सर्व उपसकांसाठी येथे जेवणाची आणि राहण्याची मोफत सोय करण्यात आली आहे. अशी माहिती आयोजक समितीचे अध्यक्ष बाळासाहेब आठवले उपाध्यक्ष उमेश इंगळे, आणि सचिव भानुदास वानखडे यांनी दिली आहे या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी बुद्ध वन आयोजक समिती आणि समता सैनिक दलाचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत तालुक्यातील व जिल्ह्यातील जास्तीत जास्त उपासक उपासिका या सोहळ्यात उपस्थितीत राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

शनिवार, ३ जानेवारी २०२५ | ३

दैनिक विदर्भ केसरी TODAY | विदर्भाचा मानबिंदू

# चंद्रपूर

GOOD MORNING

## श्री साई स्कूल ऑफ नर्सिंगमध्ये सांस्कृतिक कला महोत्सव...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे



आरमोरी : येथील श्री साई स्कूल ऑफ नर्सिंगमध्ये सुधांशा फेस्टिव्हल निमित्त वार्षिक सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांच्या कला-गुणांचे दर्शन घडावे, या उद्देशाने सांस्कृतिक कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन संस्थेचे संचालक सुधाकर साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्या मृणाल दर्वे, भूषण ठकार, संगम मेश्राम, समीर कांबळे, प्रतीक्षा क्षिरसागर, आंचल राऊत, अंजली फुलझले, प्राजक्ता गेडाम, चंदा गुरनुले आदी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना स्कूलचे संचालक सुधाकर साळवे यांनी नर्सिंग क्षेत्रातील शिस्त, संयम व समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकासाकडेही लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. सांस्कृतिक महोत्सवात गायन, नृत्य, वक्तृत्व तसेच विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. उद्घाटन कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांचा उत्साह, जोश आणि रंगतदार सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने भारून गेला.

## संक्षीप्त

### घाटंजी न प गटनेते पदी संगीताताई भुरे यांची निवड

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : अरविंद चौधरी



घाटंजी येथील नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदी काँग्रेस चे परेशभाई कारिया हे निवडून आले असून सभागृहातील न प सदस्य गट नेता म्हणून काँग्रेस च्या जेष्ठ नगरशेविका संगीताताई अरविंद भुरे यांची गटनेता म्हणून निवड झाली आहे एक अनुभवी नेतृत्व म्हणून काँग्रेस च्या सर्व नगरशेवक व अध्यक्ष यांनी एक मतांनी निवड केली आहे पक्षाने जो माझ्या वर विश्वास दाखविला व अध्यक्ष परेशभाई कारिया व सर्व नगरसेवक यांचे व काँग्रेस चे नेतृत्व मा माजी मंत्री ऍड शिवाजीराव मोघे साहेब खासदार प्रतिभाताई धानोरकर युवा नेते जितेंद्र मोघे व सर्व काँग्रेस चे कार्यकर्ता यांचे संगीताताई भुरे यांनी आभार मानले



### नव्या वर्षाचा संकल्प विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी जाणीव फाऊंडेशनचा मदतीचा हात*

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

धामणगाव : गढी जाणीव फाउंडेशन तर्फे नवीन वर्षाचे स्वागत एका आगळ्यावेगळ्या आणि पवित्र कार्याने करण्यात आले. सन २०२६ च्या सुरुवातीलाच सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, धामणगाव गढी,ता. अचलपूर येथील सर्व विद्यार्थ्यांना शालेयउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. सक्षम समाज घडवण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. मुलांच्या चेहऱ्यावरील ते निरागस हास्य हीच आमच्यासाठी नवीन वर्षाची सर्वात मोठी भेट ठरली. शिक्षणापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये आणि त्यांच्या प्रगतीला खऱ्या अर्थाने हातभार लागावा, याच उद्देशाने हा छोटासा प्रयत्न करण्यात आला. ह्या कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष - अमित भोसले, मॅनेजर स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा धामणगाव गढी यांनी भूषविले प्रमुख पाहूणे - रमेश जोशी, सौ. भोरे मॅडम, ग्रामसेवक,धामणगाव गढी, सौ. इंगळे मॅडम मुख्याध्यापक, डॉ. सचिन गावंडे, अध्यक्ष, जाणीव फाऊन्डेशन धामणगाव गढी सर्व सदस्य जाणीव फाऊन्डेशन उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करत भविष्यातही शिक्षणाच्या या प्रवासात जाणीव फाऊन्डेशन' नेहमीच विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील अशी ग्वाही दिली. सर्व विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस आणि उज्वल भविष्यास खूप खूप शुभेच्छा! दिल्या







### नाटक समाज प्रबोधनाचे साधन माजी आमदार कृष्णा गजबे

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज : मराठी रंगभूमीच्या पडत्या काळातही झाडीपट्टी रंगभूमीने आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. नाटक समाज प्रबोधनाचे मोलाचे कार्य करीत असून झाडीपट्टी रंगभूमी निवळ हौस नसून स्थानिक पातळीवर लोक संस्कृती बनली आहे. पूर्व विदर्भात आजही नाट्यसंस्कृती जिवंत आहे आणि त्यांना प्रेक्षकांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात मिळत आहे. झाडीपट्टी रंगभूमी करोडोची उलाढाल करणारी रंगभूमी ठरली असून, या रंगभूमीमुळे अनेक कलावंतांचे कुटुंब जगत आहेत, असे प्रतिपादन युवा मंडळ आमगावच्या वतीने झालेल्या नाटकाच्या उद्घाटनाप्रसंगी कृष्णा गजबे माजी आमदार यांनी केले आहे. नवीन वर्षाच्या शुभपर्वावर युवा मंडळ आमगावच्या वतीने " लोक काय म्हणतील" या सामाजिक नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक माजी आमदार कृष्णा गजबे, अध्यक्ष ओबीसी नेते मुरलीधर सुंदरकर, कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती नगराध्यक्ष लता सुंदरकर, नगरसेवक नरेश विठ्ठलानी, तालुका कृषी अधिकारी केरामी, नगरसेवक सचिन खरकाटे, ग्रामविकास अधिकारी कैलास कावळे यशवंत ढोरे, दीपक झरकर, सचिन वानखेडे, उद्योगपती सुभाष सुंदरकर, पो. पा. बोदेले, आधी उपस्थित होते. यावेळी मा. आमदार कृष्णा गजबे, नवनिर्वाचित नगराध्यक्ष लता सुंदरकर, नगरसेवक नरेश विठ्ठलानी, नगरसेवक सचिन खरकाटे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन ग्रामपंचायत सदस्य राजू कोल्हे, कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माजी सरपंच योगेश नाकतोडे यांनी केले.

# दारुच्या नशेत ॲम्बुलन्सचा थरार; मलेरिया रुग्ण नेत असतांना ॲम्बुलन्स पलटली...!

## रीडवाई-मुरुमगाव मार्गावरील पुलाजवळील घटनेमुळे धानोरा आरोग्य यंत्रणा असमर्थ...!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

■ धानोरा तालुक्यातील मुरुमगांव प्राथमीक आरोग्य केंद्रातील कंत्राटी स्वरूपात ॲम्बुलन्स चालक म्हणून काम करणाऱ्या विलास उसेंडी यांच्यावर कारवाई करण्यात आले आहे असे धानोरा तालुका अधिकारी यांचेकडुन सांगितले आहे, परन्तु सदर अपघातात जेवढे ॲम्बुलन्स चालक जबाबदार आहेत तेवढेच जबाबदार तेथील वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी सुद्धा आहेत. यावरुन असे निदर्शनास येते की धानोरा तालुका अधिकारी हे तेथील आरोग्य यंत्रणा चालविण्यासाठी असमर्थ ठरलेले आहेत.



धानोरा : रीडवाई गावातून मलेरिया बाधित बालरुग्णास उपचारासाठी मुरुमगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेत असताना ॲम्बुलन्सचा भीषण अपघात झाल्याची घटना रीडवाई-मुरुमगाव रस्त्यावरील पुलाजवळ 31 डिसेंबर रोजी घडली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठी दुर्घटना टळली आहे.

प्राप्त माहितीनुसार, रीडवाई गावातील दोन ते अडीच वर्षांची मलेरिया बाधित चिमुकली उर्फिता आशिष कोराम हिला तिची आई सोनी आशिष कोराम यांच्यासह ॲम्बुलन्स क्रमांक MH 33 T 1716 (महिंद्रा कंपनी) मधून मुरुमगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात येत होते. मात्र, ॲम्बुलन्स चालक विलास उसेंडी हा दारुच्या नशेत वाहन चालवत असल्याने त्याचा वाहनावरील ताबा सुटला आणि पुलाजवळ ॲम्बुलन्स रस्त्याच्या कडेला पलटी झाली. या अपघातात बालरुग्ण व तिच्या आईला किरकोळ दुखापत झाली असून त्यांच्यावर मुरुमगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार सुरु आहेत.

दारुच्या नशेत ॲम्बुलन्स चालविणे हा अत्यंत गंभीर व निष्काळजीपणाचा प्रकार असून, रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या चालकांवर तसेच तालुक्यातील आरोग्य यंत्रणा चालविणारे वरीष्ठ अधिकारी यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. योग्य वेळी परिस्थिती नियंत्रणात आल्याने मोठी दुर्घटना टळली असली, तरी या घटनेमुळे आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर आणि देखरेखीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## गडचिरोली जिल्ह्यात १५ दिवस जमावबंदी लागू : जिल्हादंडाधिका-यांचे आदेश

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : सिरोंचा येथे 06.01.2026 ते दिनांक 07.01.2026 या कालावधीत हजरत वली हैदरशाह बाबा उर्स यात्रा साजरा करण्यात येणार आहे. तसेच दिनांक 14 जानेवारी 2026 रोजी मकर संक्रांत जिल्हयात सर्वत्र साजरा करण्यात येणार आहे. तसेच काही विविध राजकीय पक्ष, संघटना व इतर नागरिक हे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी धरणे, मोर्चे, आंदोलने, सभा, मिरवणुक, सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्याची शक्यता असल्याने सदर कालावधीत कोणताही अनुचीत प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यात दिनांक 06.01.2026 चे 00.01 वा. ते दिनांक 20.01.2026 चे 24.00 वाजे पर्यंत महाराष्ट्र पोलीस अधिनियम, 1951 चे कलम 37 (1) (3) लागू होणेस विनंती केलेली आहे. त्यामुळे सदर कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्याच्या दृष्टीने विवक्षित कृतींना मनाई करणे व अव्यवस्थेला प्रतिबंध उपाय करणे आवश्यक आहे. याकरीता जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) आणि (3) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन दिनांक 06.01.2026 चे 00.01वा. ते दिनांक 20.01.2026 चे 24.00 वा.पर्यंत या कालावधीत पुढील गोष्टींना मनाई केलेली आहे. शस्त्र, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या किंवा लाठया किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी इतर कोणतीही वस्तु बरोबर नेणे, कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा क्षेपणास्त्र सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, किंवा जमा करणे किंवा तयार करणे यावर प्रतिबंध घालण्यात आले आहे. व्यक्तिच्या किंवा प्रेताच्या किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणने, वाद्य वाजविणे, ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धक्का पोहचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल, अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे, अगर सोंग आणणे आणि अशी चित्रे, चिन्हे, फलक किंवा इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे त्याचे प्रदर्शन करणे किंवा त्याचा जनतेत प्रसार करणे. उपविभागीय दंडाधिकारी, कार्यकारी दंडाधिकारी अथवा संबंधित पोलिस स्टेशन अधिकारी (जे शक्य असेल ते) यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणीही मिरवणूक काढू नये, पाच इसम किंवा त्यापेक्षा जास्त इसम सार्वजनिक जागेत सार्वजनिक रस्त्यावर किंवा सार्वजनिक चावडीवर दिनांक 06.01.2026 चे 00.01 वा. ते दिनांक 20.01.2026 चे 24.00 वा.पर्यंत जमा होणार नाहीत किंवा कोणतेही कार्यक्रम आयोजित करणार नाही. सदर आदेश दिनांक 06.01.2026 चे 00.01 वा. ते दिनांक 20.01.2026 चे 24.00 वा.वाजेपावेतो संपुर्ण गडचिरोली जिल्हयाच्या क्षेत्राकरीता लागु राहतील असे जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली, अविश्यांत पंडा यांनी आदेशीत केले आहे.

## डॉक्टरला रुग्णाच्या बहाण्याने लुटले

पुणे : रुग्ण तपासणी करण्याची बतावणी करुन डॉक्टरला चाकूच्या धाकाने लुटण्यात आल्याची घटना पुणे-सातारा रस्त्यावरील एका सोसायटीच्या आवारात घडली. याप्रकरणी पसार झालेल्या चोरट्यांविरुद्ध सहकारनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे अशी माहिती पोलिसांनी शुक्रवारी दिली आहे.

याबाबत एका ४९ वर्षीय डॉक्टरांनी आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दोन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार डॉक्टरांचा खासगी दवाखाना आहे. ते कात्रज भागात राहायला आहेत. ३१ डिसेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास चोरटे त्यांच्या दवाखान्यात गेले. 'एक रुग्ण अत्यवस्थ आहे. त्याची तपासणी करायची आहे', अशी बतावणी चोरट्यांनी त्यांच्याकडे केली. त्यानंतर चोरटे त्यांना घेऊन पुणे-सातारा रस्त्यावरील अथर्व परिहाज इमारतीच्या तळमजल्यावर घेऊन गेले. त्यानंतर चोरट्यांनी त्यांना चाकूचा धाक दाखविला. एका चोरट्याने त्यांच्या बोटावर चाकूने वार केला. चोरट्याबरोबर असलेल्या साथीदाराने डॉक्टरांकडील दुचाकीचा ताबा घेतला डॉक्टरांच्या पिशवीत ३० हजारांची रोकड, मोबाइल संच, एक लाख रुपयांचा चांदीचा जग असा मुद्देमाल होता. दुचाकी, मोबाइल संच, रोकड, चांदीचा जग असा मुद्देमाल घेऊन चोरटे पसार झाले. या घटनेनंतर घाबरलेल्या डॉक्टरांनी सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

## विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, भावनिक आणि शारीरिक विकासाला प्रोत्साहन देणारे म्हणजे वार्षिक शालेय सांस्कृतिक कला महोत्सव

### आमदार कृष्णा गजबे यांचे प्रतिपादन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : द आदिवासी शैक्षणिक विकास महामंडळ, कुरखेडा, जि. गडचिरोली द्वारा संचालित स्वर्णदीप हायस्कूल तथा ज्युनिअर कॉलेज कुरखेडा यांचे वतीने शालेय सांस्कृतिक "नवरंग" वार्षिक कला महोत्सव म्हणजे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, त्यांची सांस्कृतिक जाणीव वाढवण्यासाठी शाळांमध्ये आयोजित केला जाणारा एक वार्षिक कार्यक्रम असतो, ज्यात नृत्य, गायन, नाट्य, हस्तकला, लोककला, विज्ञान प्रदर्शन आणि क्रीडा स्पर्धा यांसारख्या विविध कला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो आणि त्यांना भारतीय तसेच जागतिक संस्कृतीची ओळख होते. या प्रसंगी कार्यक्रमांचे उद्घाटक मा. आमदार कृष्णाजी गजबे तसेच अध्यक्ष म्हणून अनिल एल. नुतिलकंठावर प्राचार्य स्वर्णदीप हाय. कुरखेडा, प्रमुख अतिथी म्हणून चांगदेवजी फाये, प्रमुख मार्गदर्शन मा. मुनिराज कुथे नेवजाबाई हितकारणी विद्यालय ब्रह्मपुरी, प्रा. संतोष मेश्राम सर, डी. सहाळा सर, चेतन गहाण सर, कु. स्नेहा तुलावी विद्यार्थिनी प्रमुख आणि सर्व शिक्षकवृंद तसेच सर्व विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.










# खापरवाडा येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न

### सलग सातव्या वर्षी 'श्री.नारायण संस्थेचा' स्तुत्य उपक्रम

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : मूर्तिजापूर प्रतिनिधी

> नवीन वर्षाची सुरुवात अशा पवित्र कार्याने व्हावी, हा आमचा मानस असतो. रक्तदात्यांच्या सहकार्यामुळेच हे सातवे वर्ष यशस्वी होऊ शकले.
>
> — **सतिश विनायक** गवई संस्थापक अध्यक्ष, श्री. नारायण बहुउद्देशीय संस्था



नवीन वर्षाचे स्वागत आणि शौर्य दिनाचे औचित्य साधून श्री.नारायण बहुउद्देशीय संस्था, खापरवाडा यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत संस्थेने यंदा सलग सातव्या वर्षी हा उपक्रम राबवून मानवतावादी कार्याचा वारसा पुढे चालवला आहे. मानवतावादी कार्याचे सातवे गौरवशाली वर्ष श्री.नारायण बहुउद्देशीय संस्था ही मूर्तिजापूर तालुक्यात गेल्या सहा वर्षांपासून सातत्याने विविध सामाजिक व मानवतावादी उपक्रम राबवत आहे. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मान्यवरांची उपस्थिती या शिबिराचे उद्घघाटन खापरवाडा गावचे ज्येष्ठ नागरिक वासुदेव धारपवार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी खापरवाडा ग्रामपंचायत सदस्य गोपाल जोध, अक्षय टापरे, देविदास सावळे, हिंमत गवई, रमेश सावळे, सुधाकर तायडे, नाजुक गवई यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. २१ रक्त पिशव्यांचे संकलन शिबिरात तरुणांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. दिवसभरात एकूण २१ रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने समाधान गवई, कमलेश तायडे, गोपाल जोध, अभय गवई, राहुल दामोदर, रितेश गवई, गोपाल घोगरे, सचिन श्रीनाथ, विनोद ठाकरे, प्रज्वल सावळे, ईश्वर गवई व इतर रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक कर्तव्य पार पाडले. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थापक अध्यक्ष सतिश गवई यांनी उपस्थितांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि सर्व रक्तदाते व प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानले.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू TODAY
गडचिरोली
GOOD MORNING

## सन 2025 - 26 खरीप पिकाची हंगामी पैसेवारी जाहीर

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली, दि.02: खरीप पिकाची हंगामी पैसेवारी तहसिलदार यांचेकडून प्राप्त माहितीचे आधारे संकलीत करुन गडचिरोली जिल्ह्याची सन 2025 - 2026 या वर्षाची खरीप पिकाची हंगामी पैसेवारी जाहीर करण्यात येत आहे. गडचिरोली जिल्ह्यात एकूण 1689 गावे असून खरीप पिकाची गावे 1555 आहेत. व एकूण पिका खालील क्षेत्राच्या 2/3 क्षेत्रामध्ये खरीप पिकाची पेरणी केलेल्या रब्बी गावांची संख्या 04 आहेत. त्यापैकी खरीप गावामध्ये पीके नसलेली गांवे 53 आहेत. सदर खरीप पिक असलेल्या गावांपैकी 50 पैशाचे आत पैसेवारी असलेले 0 असून 50 पैशाचे वर पैसेवारी असलेल्या एकूण खरीप पिक असलेल्या गावांची संख्या 1506 आहेत. अशा प्रकारे एकूण 1506 खरीप पिक असलेल्या गावाची पैसेवारी जाहीर केलेली आहे. गडचिरोली जिल्ह्याची खरीप हंगाम 2025 - 2026 या वर्षाची हंगामी पैसेवारी ही 0.77 आहे. असे जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी कळविले आहे.

## संक्षिप्त





### मुलांच्या वस्तीगृहामध्ये गुरुदेव प्रार्थना मंदिराची स्थापना

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज : आज मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित मुलांच्या वसतिगृह मध्ये गुरुदेव प्रार्थना मंदिराची स्थापना करण्यात आली.
या उपक्रमामागील मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सद्बुद्धी, शिस्त व संस्कारांची जोपासना, दररोजच्या जीवनात प्रार्थना, ध्यान व आत्मचिंतनाची सवय, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचे संस्कार विद्यार्थ्यांवर रुजवणे, शिक्षणासोबत नैतिक मूल्ये व सेवाभाव निर्माण करणे, विद्यार्थ्यांमध्ये एकता, सकारात्मकता व आत्मविश्वास वाढवणे. गुरुदेवांच्या आशीर्वादाने हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरेल. यावेळेस उपस्थित संस्थेचे सचिव मनोजभाऊ वनमाळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सदस्य निशांतजी वनमाळी, प्राचार्य साईनाथजी अद्दलवार सर , प्राचार्य नितीनजी कासार सर , वसतिगृह अधीक्षक सुनीलजी हिरापुरे, वरिष्ठ लिपिक नितीनजी शेंडे उपस्तीत होते. सदर प्रार्थना रोज सायंकाळी 6 वाजता राहील. विध्यार्थी सह नागरिक देखील या प्रार्थनेला उपस्तीत राहू शकतात असे प्रतिपादन निशांत मनोज वनमाळी जिल्हाध्यक्ष विद्यार्थी काँग्रेस गडचिरोली यांनी केले.



### जवाहरलाल नेहरू शाळेतील शिक्षकांच्या तत्परतेने वाचले आजोबांचे प्राण....!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : नगरपरिषदेच्या पि.एम.श्री जवाहरलाल नेहरू उच्च प्राथमिक शाळा, रामनगर येथे ३० डिसेंबर रोजी नातवंडांना घेण्यासाठी नेहमीप्रमाणे शाळेत आलेल्या एका वृद्ध आजोबांना अचानक अर्धांगवायूचा झटका आला. मात्र जवाहरलाल नेहरू शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांच्या तत्काळ मदतीमुळे मोठा अनर्थ टळला. परीक्षित सतीश येरेकर या विद्यार्थ्याचे आजोबा कवडू भोजराज येरेकर (वय ६६ वर्षे) रा. रेड्डी गोडाऊन चौक, गडचिरोली हे शाळेमध्ये आपल्या नातवंडास घेन्याकरीता आले होते. मात्र त्यांची प्रकृती अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने ते जमिनीवर बसले. ही बाब लक्षात येताच शाळेचे मुख्याध्यापक सुधीर गोहणे सर, शिक्षक महेंद्र शेडमाके सर तसेच सूर्यकांत मडावी सर यांनी तत्काळ त्यांच्याकडे धाव घेतली व वाहनाची व्यवस्था करत त्यांना तत्परतेने रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.





### श्रमदानातून केली रस्त्याची दुरुस्ती : मोहन ठाकरे व ग्रा. पं. पदाधिका-यांचा पुढाकार

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली :- मागील अनेक दिवसांपासून तालुक्यातील गोगाव ते महादवाडी या रस्त्याची प्रचंड दूरवस्था झाली आहे. मात्र संबंधित विभागाकडून रस्त्याची दुरुस्ती करण्यात येत नसल्याने सामाजिक कार्यकर्ते मोहन ठाकरे व चुरचुरा ग्रा.पं.चे सरपंच प्रशांत खोब्रागडे यांनी पुढाकार घेत मजुरांकरवी या रस्त्यावरील खड्डयांमध्ये मुरुम टाकून श्रमदानातून रस्त्याची डागडुजी केली. त्यामुळे या मार्गाने प्रवास करणा-या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. गोगाव ते महादवाडी - चुरचुरा या रस्त्याची मागील अनेक दिवसांपासून प्रचंड दूरवस्था झाली आहे. जागोजागी खड्डे पडले असल्याने आवागमन करण्यास कसरत करावी लागत आहे. संबंधित विभागाकडे रस्ता दुरुस्तीबाबत मागणी करूनही रस्त्याची दुरुस्ती करण्यात न आल्याने कोटगल येथील सामाजिक कार्यकर्ते मोहन ठाकरे व चुरचुरा गट ग्रा.पं.चे सरपंच प्रशांत खोब्रागडे यांनी रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी नववर्षाला पुढाकार घेत मजुरांकरवी खड्डयांमध्ये मुरुम टाकून श्रमदानातून रस्त्याची डागडुजी केली. त्यामुळे यामार्गाने ये-जा करणारे नागरिक, शाळकरी विद्यार्थी व वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सामाजिक कार्यकर्ते व ग्रा.पं. पदाधिका-यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.

# कुनघाडा रै बस थांब्यावर अपघात

## गावकऱ्यांच्या वतीने मुख्य मार्गावर रास्ता रोको आंदोलन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

चामोर्शी : गडचिरोली महामार्गावरील कुनघाडा रै बस थांब्यावर चामोर्शी कडून गडचिरोली मार्गे जाणाऱ्या भरदार चारचाकी स्कॉर्पिओने चामोर्शीकडे जाणाऱ्या दुचाकीला धडक दिल्यामुळे दुचाकीवरील एक गंभीर तर दुसरा किरकोळ जखमी झाला आहे.

सदर घटना आज नववर्षाच्या पहिल्याच दिवशी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास घडली. अतुल तुळशीराम कोसमशिल्ले (४२) रा. कुनघाडा रै असे गंभीर जखमीचे नाव असून, संतोष सुधाकर भांडेकर (३८) असे किरकोळ जखमीचे नाव आहे. बस थांब्यावर बिस्वास यांचा ढाबा असल्याने समोरील परिसरात जड वाहनांची पार्किंग राहत असल्याने कुनघाडा रै गावातून जाणाऱ्या वाहनास हायवेवर चालणारे वाहन दिसत नसल्यामुळे अपघात होत असल्याचे बोलल्या जात आहे. अतुल कोसमशिल्ले व संतोष भांडेकर हे दोघे दुचाकीने कुनघाडा रै वरून चामोर्शीकडे जात होते. चामोर्शी वरून गडचिरोलीकडे जाणारे भरधाव वेगाने जाणाऱ्या स्कॉर्पिओ वाहनाने दुचाकीला धडक दिल्यामुळे दुचाकीवरील दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. अतुल कोसमशिल्ले याच्या डोक्याला मार लागल्याने कानातून रक्तस्त्राव सुरू असल्याने त्यास गडचिरोली वरून नागपूर येथे हलविले आहे. तर संतोष भांडेकर हा किरकोळ जखमी आहे. स्कॉर्पिओ गाडीचा पत्ता लागला असल्याचे अद्याप कळले नसून, पुढील तपासाची सूत्रे चामोर्शी पोलिसांकडे असल्याचे समजते. गावकऱ्यांच्या मदतीने मुख्य मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले असून यावेळी पोलिसांचा मोठा फौज फाटा तैनात करण्यात आला होता.





### तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून

पुणे : हडपसर भागातील फुरसुंगी येथे दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी एका पादचारी तरुणाच्या डोक्यात दगड घालून खून केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सायंकाळी घडली. या घटनेनंतर हल्लेखोर पसार झाले असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. आकाश कृष्णा चाबुकस्वार (वय २१, रा. फुरसुंगी, हडपसर-सासवड रस्ता) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी दुचाकीवरील हल्लेखोरासह त्याच्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पसार झालेल्या आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आल्याची माहिती फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाश चाबुकस्वार गुरुवारी सायंकाळी फुरसुंगी परिसरातून जात असताना दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी त्याला अडवले. त्यांच्यात वाद झाल्यानंतर आरोपींनी आकाशला मारहाण केली आणि त्याच्या डोक्यात दगड घालून ते भरधाव वेगाने पसार झाले. गंभीर जखमी झालेल्या आकाशला नागरिकांनी तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

## चौकशीच्या धसक्याने चामोर्शी शिक्षक पतसंस्थेत गायब भेटवस्तूची चोरीने खरेदी...!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

चामोर्शी : येथील प्राथमिक शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित चामोर्शी /मूलचेरा र नं २७५ या संस्थेत काही दिवसांपासून लाखोच्या घोटाळ्याचा खुलासा झाला असल्यामुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्र ढवळून निघाले असतांनाच दि. २३ डिसेंबर २०२५ च्या सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, चामोर्शी यांच्या पत्रानुसार श्री, आर. टी. वाघमारे सहायक अधिकारी अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, चामोर्शी यांचे कडून संस्थेच्या चौकशीला सुरुवात झाली असून पतसंस्थेच्या संचालक मंडळाने आपली बरखास्ती टाळण्यासाठी व पुढील कार्यवाही पासुन बचाव करण्यासाठी विविध मार्गाचा वापर करून सर्व All Well आहे असे दाखविण्याचा



केविलवाणा प्रयत्न सुरू केला आहे.

याचाच एक भाग म्हणून सभासदांना सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षात वाटप केलेल्या भेटवस्तू ज्या संचालक मंडळाने आपल्या घशात घातल्या होत्या त्या घाई गडबडीत पुरवठादाराकडून मागवून संस्थेत आणून ठेवल्याचे दिनांक 01 जानेवारी रोजी तक्रारदार सचिन कुळसंगे, अशोक रायशिडाम, हेमंत चावरे व इतरांच्या प्रत्यक्ष पाहणीत दिसून आले. तसेच प्रभारी व्यवस्थापक यांच्यावर दबाव आणून त्यांच्याकडून संस्थेच्या बचावासाठी मागील तारीख दाखवून पत्र लिहून घेत असल्याचे लक्षात येते. असे जरी होत असले तरी श्री सचिन भास्कर कुलसंगे व इतर तक्रारदाराकडे अगोदरच भक्कम पुरावे असल्याने अध्यक्ष व संचालक मंडळाची धावपळ कामी येणार नाही असे दिसते. दुसरीकडे मात्र चौकशी अधिकारी श्री, आर. टी. वाघमारे यांनी एकतर्फी चौकशी सुरू केल्याचे कळते. तक्रारदार श्री, सचिन भास्कर कुलसंगे व इतर यांना देखील पत्र देऊन चौकशी ठिकाणी बोलवणे गरजेचे असतांना श्री, आर. टी. वाघमारे यांनी ज्यांचेवर आरोप आहेत त्यांनाच सोबत घेऊन चौकशी सुरू केल्याचे कळते. त्यामुळे संस्थेचे अध्यक्ष, व्यवस्थापक व संचालक मंडळाना पुरावे नष्ट करण्यासाठी रान मोकळे झाल्याचे दिसते.

त्यामुळे निष्पक्ष चौकशी होण्यासाठी दि. २१ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, चामोशी यांचे दालनातील सुनावणी दरम्यान भ्रष्टाचार सिद्ध होत असल्याचे पुरावे सादर केल्यानुसार अगोदर अध्यक्ष व व्यवस्थापक यांना पदावरून हटवून प्रशासकाची नियुक्ती करूनच चौकशी करावी व सहकार कायद्यानुसार गुन्हा दाखल करून सर्व सामान्य सभासदांच्या खिशावर दरोडा मारलेली रक्कम वसूल करावी अशी मागणी बहुतांश सर्वसामान्य सभासद करीत आहेत.

## महिलांनी आणला श्रमदानातून, महिला सहभागातून गावात पाणी

### ग्रामपंचायत सावरगाव मुख्यमंत्री पंचायत राज अभियानातून, श्रमदानातून, लोकसहभागातून पाण्याची सोई सुविधा उपलब्ध

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गडचिरोली तालुक्यातील मौजा सावरगाव हे गाव प्राचीन काळापासून दगडावर बसलेला गाव असून एक हि पाण्याचा स्त्रोत बारमाही नसून गावात दरवर्षी भासत असलेली पाणी टंचाई, १ कि. मी. वरून पाण्यासाठी करत असलेली पायपीट गावातील महिलांनी मोठा पुढाकाराने सर्व सहभागातून गावात पिण्यासाठी आणला पाणी. काही वर्षापासून शासनाला पाण्यासाठी पाठपुरावा करून नेहमी गावातील लोकसंख्या कमी प्रमाणात असल्याच्या कारणाने योजना राबविता येत नाही असे शासनाचे मत असून दरवर्षी प्रस्ताव आम्ही जिल्हा परिषद येथे सादर करीत आहोत. तरी पण शासनांनी पाण्याची कोणतीही योजना ण देता सदर टंचाई विभाग अंतर्गत दरवर्षी हात पंप २०० ते ३५० फुट गावात मारतात तरी पण पाण्याचा एक बुंद सुद्धा मिळत नाही व ते हातपंप बंद आहेत. म्हणून ग्रामपंचायत सावरगांव अंतर्गत राबवीत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत गावात पाणी आणण्याचे निश्तित केले असून, गावालगत असलेल्या नाल्यावर बंधारा बांधकाम करून जवळील असलेल्या अश्विना रतन सिडाम शेतामधून १ कि. मी. अंतरावरून पाईप द्वारे गावात मधोमत १००० लिटर ची टाकी उभारणी केली. व रोडच्या बाजूने वरील पाईप द्वारे पाण्याचा पुरवठा केला असता गावातील कुटुंबाना पुरवठा करण्यात आले व सदर पाण्याचे क्लोरीकेश निर्जतुकी करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत ला देण्यात आली. असता गावातील रुंदाताई रविंद्र मडावी (सरपंच) नीता मडावी, अरुणा सिडाम, सुलोचना सिडाम, सरिता, सिडाम, वनिता सिडाम, कुंदा सिडाम, अश्विनी सिडाम, अल्का सिडाम, गीता सिडाम, रेश्मा सिडाम, गीता मडावी व ग्राम पंचायत अधिकारी व कर्मचारी, गावातील सर्व महिलांनी मोठ्या पुढाकाराने सहकार्य केले असता गावकऱ्याचे कार्य मोलाचे असून सदर भविष्यात पाण्याची सोय निर्माण करण्यात यावे.



## मौशिखांब जिल्हा परिषद शाळेत ‘खरी कमाई’ उपक्रम उत्साहात

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे**

गडचिरोली तालुक्यापासून अवघ्या २२ किलोमीटर अंतरावर असलेल्या मौशिखांब येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी ‘खरी कमाई’ हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. जगदीश बोरकुटे यांच्या हस्ते लाल फित कापून करण्यात आले.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. आवारी सर यांच्यासह भुरशे सर, चौधरी सर, गज्जलवार सर, पेटकर मॅडम, लाकूडवाहे मॅडम व तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री. शशिकांत कुकुडकार, श्री. नितीचंद कुकुडकार, पालकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी भेळ, आलू पिंगर, भजी, चिवडा, गुपचूप, गोड बोर, मिसळ, ढोकळा, समोसे आदी खाद्यपदार्थ स्वतः तयार करून विक्रीस ठेवले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व मेहनतीला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मार्गदर्शन करताना शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. जगदीश बोरकुटे यांनी सांगितले की, “आजचे युग स्पर्धेचे असून केवळ शिक्षण नव्हे तर आर्थिक स्वावलंबनासाठी स्वयंरोजगाराचे महत्त्व विद्यार्थ्यांनी लहानपणापासून समजून घेतले पाहिजे.” त्यांच्या या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व उद्योगशीलतेची जाणीव निर्माण झाली.

हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरला असून भविष्यातही असे उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा पालकवर्गातून व्यक्त करण्यात आली.

## लॉयड्स मेटल कडून जीडीपीएल (GDPL) स्पर्धा स्थगित करण्याची घोषणा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यातील तरुणांच्या भविष्याचा विचार करत लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडने यंदाच्या GDPL क्रिकेट स्पर्धेचे आयोजन पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या शेकडो स्थानिक उमेदवारांच्या सरावावर परिणाम होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. स्पर्धेसाठी निश्चित करण्यात आलेली मैदाने ही अनेक तरुणांसाठी शारीरिक तयारी आणि सरावाची मुख्य केंद्रे होती. GDPL च्या वेळापत्रकामुळे या सरावात अडथळा निर्माण होऊन उमेदवारांच्या करिअरवर विपरीत परिणाम होऊ शकतो, ही बाब लक्षात घेत कंपनीने समाजहिताला प्राधान्य दिले आहे.

LLOYDS METALS

LMEL चे व्यवस्थापकीय संचालक श्री. बी. प्रभाकरन म्हणाले, “GDPL च्या माध्यमातून गडचिरोलीला राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा अनुभव देण्याचे आमचे स्वप्न होते. मात्र स्थानिक तरुणांचे करिअर आणि त्यांच्या भविष्यासमोर आम्ही कोणतीही तडजोड करू शकत नाही. पोलीस भरतीसाठी हे तरुण ज्या मैदानावर दिवस-रात्र मेहनत घेत आहेत, ते आमच्यासाठी अधिक महत्त्वाचे आहे.”

कपिल देव आणि मीका सिंग यांच्यासारख्या दिग्गजांच्या उपस्थितीत होणारा हा भव्य सोहळा स्थगित करणे कठीण असले, तरी तरुणांच्या व्यावसायिक भविष्यासाठी हा निर्णय आवश्यक होता, असेही त्यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, GDPL साठी जिल्हा प्रशासनाकडून सर्व आवश्यक परवानग्या आधीच घेण्यात आल्या होत्या. पायाभूत सुविधा, नियोजन आणि सेलिब्रिटी करारांवर मोठी गुंतवणूकही करण्यात आली होती. मात्र आर्थिक नुकसान स्वीकारूनही कंपनीने समुदायाच्या दीर्घकालीन हिताला प्राधान्य दिले आहे. GDPL यंदा स्थगित असली, तरी गडचिरोलीतील क्रीडा विकास आणि सामाजिक उपक्रमांसाठी लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे योगदान सुरूच राहील, असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे. पोलीस भरतीसाठी तयारी करणाऱ्या सर्व उमेदवारांना कंपनीकडून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छाही देण्यात आल्या आहेत.




# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे.
लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी
आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर
उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.

## खालील सर्व जिल्हे आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक तालुक्यासाठी प्रत्येकी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### नागपूर
जिल्हा प्रतिनिधी
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक
पेज डिझायनर.

- कोरल
- फोटोशॉप
- इनडिजाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata)
आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**